# कल्याण शहरातील निवडक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयीन ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचक वर्गाच्या समस्या : एक अभ्यास

**टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे**
**तात्विक व सामाजिक विदयाशाखेंतर्गत**
**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील एम. फिल. पदवीसाठी सादर केलेला प्रबंध**


संशोधिकेचे नांव
**शितल लक्ष्मण अहिरे**

मार्गदर्शक
**डॉ. शिल्पा वाघचौरे**
ग्रंथपाल
जी.इ.स. कॉलेज ऑफ एज्युकेशन ॲण्ड रिसर्च,
परेल, मुंबई - ४०००१२.

**ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग**


**जुलै, २०१६.**

# Declaration by Student

I hereby declare that the dissertation entitled **"कल्याण शहरातील निवडक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयीन ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचक वर्गाच्या समस्या : एक अभ्यास"** completed and written by me has not previously formed the basis for the award of any Degree or other similar title upon me of this or any other Vidyapeeth or examining body.

**Place :** Kalyan
**Date : 21**th July 2016

**Ms. Shital Ahire**
Research Student

# Declaration of Research Guide

This is certify that the thesis entitled **“कल्याण शहरातील निवडक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयीन ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचक वर्गाच्या समस्या : एक अभ्यास”** which is being submitted herewith for the award of the Master of Philosophy (M.Phill) in Library and Information Science Faculty of Moral and Social Sciences Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune is the result of original research work completed by Mrs. Shital Ahire under my supervision and guidance. To the best of my knowledge and belief the work incorporated in this dissertation has not formed the basis for the award of any degree or similar title of this or any other university or examining body upon him.

**Place :** Parel, Mumbai.
**Date : 21** th July 2016

**Dr. (Mrs) Shilpa Waghchoure**
Research Guide

# Acknowledgement

टिळक महाराष्ट्र विदयापीठ , पुणे विदयापीठाचा पदव्युत्तर संशोधन शिक्षणक्रम ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदवी अभ्यासक्रमामध्ये **"कल्याण शहरातील निवडक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयीन ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचक वर्गाच्या समस्या : एक अभ्यास"** या विषयावरचे संशोधन पूर्ण करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

कोणतेही संशोधन पूर्ण होण्यासाठी सर्वात महत्वाची बाब म्हणजे मार्गदर्शन होय. योग्य मार्गदर्शनाशिवाय संशोधनकार्य पूर्ण होऊच शकत नाही. उत्कृष्ट मार्गदर्शन व मार्गदर्शक मिळणे ही मुळात भाग्याची बाब आहे. माझ्यासाठी सर्वात आनंदाची व अभिमानाची बाब अशी की , हे संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी मला माझे आदरणीय मार्गदर्शक **डॉ.शिल्पा वाघचौरे** यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. त्यामुळे माझे मार्गदर्शक **डॉ. शिल्पा वाघचौरे मॅडम** यांचे ऋण व्यक्त करण्यापेक्षा त्यांच्या ऋणातच राहणे मला जास्त आवडेल.

मी कार्यरत असलेल्या जे मोहिंदरसिग काबलसिंग डिग्री कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, कल्याण या कॉलेजच्या प्राचार्यांनी वेळोवेळी केलेल्या सहाकार्याबददल त्यांची आभारी आहे. तसेच संशोधनात समावेश केलेल्या सर्व महाविदयालयांचे प्राचार्य व विदयार्थिनी वाचकवर्ग यांनी केलेल्या सहकार्याबददल मी आभारी आहे.

तसेच एम. फिल चा अभ्यास व संशोधन काळात सतत प्रेरणा देणारे **डॉ. धनिष्ठा खंदारे व माझे वडील श्री. लक्ष्मण राजाराम अहिरे** यांची मी ऋणी आहे.

संशोधन कार्यात ज्या ज्ञात अज्ञातांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केली त्या सर्वांची मी आभारी आहे.

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | अभ्यासकाचे प्रमाणपत्र | I |
| २. | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | II |
| ३. | ऋणनिर्देश | III |
| ४. | तक्त्यांची यादी | IV |
| ५. | वर्तुळालेखाची यादी | V |
| ६. | आलेखांची यादी | VI |
| **प्रकरण पहिले** | **प्रस्तावना** | **१-१६** |
| १.१ | पार्श्वभूमी | १ |
| १.२ | संशोधनाची गरज | २ |
| १.३ | विदयार्थिनींना महाविदयालयीन ग्रंथालयाबाबत येणाऱ्या समस्या | ४ |
| १.४ | संशोधनाचा उददेश आणि हेतू | ६ |
| १.५ | संशोधनाची उदिद्ष्टये | ६ |
| १.६ | संशोधनाची गृहीतके | ७ |
| १.७ | संशोधन पध्दती | ७ |
| १.७.१ | वर्णनात्मक संशोधन पध्दती | ७ |
| १.७.२ | नमुना निवड | ८ |
| १.७.३ | कल्याण शहरातील महाविदयालयाची यादी | ९ |
| १.७.४ | अभ्यासात घेतलेल्या निवडक महाविदयालयीन ग्रंथालयाची यादी | ११ |
| १.७.५ | जनसंख्या | १२ |
| १.७.६ | प्रश्नावलीचे स्वरूप | १२ |
| १.८ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | १२ |
| १.९ | संशोधनासाठी माहिती संकलनाची तंत्रे व साधने | १३ |
| १.९.१ | विदयार्थिनी वाचक वर्गासाठी प्रश्नावली | १४ |
| १.१० | अभ्यासाची रचना | १४ |

| | | |
|---|---|---|
| **प्रकरण दुसरे** | **संदर्भसाहित्याचा आढावा** | **१७-३१** |
| २.१ | पार्श्वभूमी | १७ |
| २.२ | राष्ट्रीय साहित्याचा आढावा | १८ |
| २.३ | आंतरराष्ट्रीय साहित्याचा आढावा | २३ |
| **प्रकरण तिसरे** | **कल्याण शहराबददल माहिती** | **३१-५६** |
| ३.१ | कल्याणचा शैक्षणिक इतिहास | ३३ |
| ३.२ | स्त्री – शिक्षण | ३७ |
| ३.३ | अभ्यासात घेतलेल्या महाविदयालयांची व त्यांच्या ग्रंथालयांची माहिती | ३८ |
| **प्रकरण चौथे** | **माहितीचे संकलन , विश्लेषण आणि सादरीकरण** | **५७-७९** |
| ४.१ | नमुना निवड | ५८ |
| ४.२ | न्यादर्शचा आकार | ६० |
| ४.३ | ग्रंथालयीन महाविदयालयाची यादी व विदयार्थिनी संख्या | ६० |
| ४.४ | माहिती संकलनाचे नियोजन | ६१ |
| ४.५ | विदयार्थिनी वाचक वर्गाच्या प्रश्नावली संदर्भात माहितीचे संकलन , विश्लेषण आणि सादरीकरण | ६२ |
| **प्रकरण पाचवे** | **निष्कर्ष ,शिफारशी , सारांश आणि पुढील संशोधनास दिशा** | **८०-८६** |
| ५.१ | निष्कर्ष | ८१ |
| ५.२ | शिफारशी | ८४ |
| ५.३ | सारांश | ८५ |
| ५.४ | पुढील संशोधनास दिशा | ८६ |

| | | |
|---|---|---|
| | **परिशिष्ट** | **८७-९७** |
| १ | संदर्भ ग्रंथसूची | ८९ |
| २ | प्रश्नावली विदयार्थिनी वाचकवर्गासाठी | ९४ |
| ३ | अभ्यासाठी निवडलेल्या ग्रंथालयीन महाविदयालयांची माहिती | ९८ |
| ४ | कल्याण नकाशा | ९९ |

# तक्त्यांची यादी


| तक्ता क्र | तक्त्यांचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४.५.१ | विदयार्थिनी वाचकवर्गाच्या प्रश्नावलीचे विश्लेषण | ६३ |

## आलेखाची यादी


| आलेखाचे क्र. | आलेखाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४.५.९ | ग्रंथालयात विदयार्थिनी वाचकवर्गाच्या प्रसाधनगृहेच्या समस्येसाठीचा तपशील | ७२ |
| ४.५.१० | ग्रंथालयात प्रकाश व्यवस्थेचा तपशील | ७३ |
| ४.५.११ | ग्रंथालयीन सेवेबाबत सूचनापेटीच्या व तक्रार पेटीच्या उपलब्धतेचा तपशील | ७४ |
| ४.५.१२ | सूचना व विमोचन बैठकीचा तपशील | ७५ |
| ४.५.१३ | ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या सहकार्याचा विदयार्थिनी वाचकवर्गा-साठीचा तपशील | ७६ |
| ४.५.१४ | ग्रंथालयात पुस्तकांतून माहिती गोळा करून देण्यास ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या सहकार्याचा तपशील | ७७ |
| ४.५.१५ | विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्या ग्रंथालय समितीकडून सोडविण्याचा तपशील | ७९ |
| ४.५.१६ | विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्या सोडविण्यासाठी विदयार्थि - वर्गाचा पाठिंबा त्याचा तपशील | ८० |

# वर्तुळालेखाची यादी


| वर्तुळालेख क्र | वर्तुळालेखाचे नांव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४.५.१ | विदयार्थिनी वाचकवर्गाचा ग्रंथालयीन वापराचा तपशील | ६४ |
| ४.५.२ | ग्रंथालयामध्ये विदयार्थिनी वाचकवर्गासाठी वेगळा वाचन कक्षाचा तपशील | ६५ |
| ४.५.३ | ग्रंथालयात विदयार्थिनी वाचकवर्गासाठी वेगळया रांगेचा तपशील | ६६ |
| ४.५.४ | ग्रंथालयात स्त्री – वर्गाधिष्ठित पुस्तकांच्या उपलब्धतेचा तपशील | ६७ |
| ४.५.५ | ग्रंथालयात स्त्री – शिक्षणाबदद्ल पुस्तकांच्या उपलब्धतेचा तपशील | ६८ |
| ४.५.६ | ग्रंथालयीन सेवा विदयार्थिनी वाचकवर्गासाठी देतांना भेदभावाचा तपशील | ६९ |
| ४.५.७ | ग्रंथालयात विदयार्थिनी वाचकवर्गासाठी वेगळया संगणक कक्षेचा तपशील | ७० |
| ४.५.८ | ग्रंथालय समितीमध्ये विदयार्थिनी प्रतिनिधीच्या समावेशाचा तपशील | ७१ |

# प्रकरण पहिले

# प्रस्तावना

## १.१ पार्श्वभूमी

सामाजिक विकासाचा **"स्त्री शिक्षण प्रसार"** हा मध्यबिंदू आपण मानतो पण त्याच्या संवर्धनात येणाऱ्या अनेक अडचणी या बहुतांशी मानवनिर्मित असतात. संपूर्ण व्यवस्था आमूलाग्र बदलणे हे प्रथमदर्शनी जरी अशक्य बाब असली तरी किमान पध्दत बदलणे हे आपल्या आवाक्यातील आहे. म्हणूनच विदयार्थिनींना ग्रंथालय सेवेत जास्तीत - जास्त सोयी उपलब्ध केल्यास त्यांचे सक्षमीकरण तर होईलच व त्याचबरोबर अनेक व्यावसायिक दालने त्यांच्यासाठी उपलब्ध होतील. म्हणूनच सदयस्थितीत ग्रंथालय संदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचक वर्गाच्या समस्येबददल हा शोध प्रकल्प सादर करताना एम. फिल ची विदयार्थिनी म्हणून मला आनंद वाटतो आहे.

ग्रंथालयात विदयार्थिनी या मुख्यत्वेकरून क्रमिक - पुस्तके वाचण्यासाठी देवाण - घेवाण करताना दिसतात. काही अपवाद वगळल्यास त्यांचा कल संदर्भ ग्रंथाकडे कमी दिसतो. प्रत्येक विषयाचा सखोल व चिकित्सक अभ्यास करण्याची अनास्था ही ग्रंथालय सेवेत असणाऱ्या समस्येत दडलेले आहे. या समस्येचे निराकरण केल्यास विदयार्थिनी जास्त संख्येने जास्तीत - जास्त वेळ ग्रंथालयाकडे येतील. हा मुददा लक्षात घेऊन मी त्यांच्या महाविदयालयीन ग्रंथालय सेवेतील विदयार्थिनी वाचक वर्गाच्या समस्या अभ्यासण्याचा प्रयत्न या शोध प्रकल्पात केला आहे.

शिक्षणाचा मुळ पाया स्त्री - शिक्षण प्रसार व संवर्धानातच आहे. म्हणून विदयार्थिनींना अधिकाधिक शिक्षण सोयीचे करावयाचे असेल तर त्यामध्ये सोईस्कर व सुखकर ग्रंथालय सेवा हा एक महत्वाचा मुदद्‌ा आहे. हे मी कल्याण शहरातील निवडक कॉलेजमधील विदयार्थिनींना समक्ष भेटून या विषयावर त्यांना प्रश्नावली च्या द्‌वारे त्यांची मते आजमावण्याचा प्रयत्न केला आहे. प्रश्नावलीतून मिळणाऱ्या उत्तरातून त्यांच्या विविध समस्येबददल माहिती या सर्वेक्षणातून मिळाली व त्यांच्या आधारावर मी ठराविक निष्कर्ष काढले आहेत. त्यानुसार मला काही शिफारशी वजा उपाययोजना ग्रंथालयतील सोयी व पध्दतीतील बदल सुचवू इच्छिते.

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास एकूण विशेषत : ६ प्रकरणात विभागला असून त्यामध्ये प्रमुख बाबींचा विचार केला आहे. या शोध अभ्यासाची नोंद महाविदयालयातील ग्रंथालयांनी घेऊन त्यानुसार ग्रंथालय सेवेत विदयार्थिनींसाठी खास सोयी उपलब्ध केल्यास, माझ्या या संशोधन प्रयत्नांचे सार्थक झाल्याचा मला आनंद होईल. अर्थात याकरीता महाविदयालयीन व्यवस्थापन समितीच्या बैठकीत त्याचे अधिकृत्त निर्णय व त्यानुसार अंमलबजावणी गृहीत व अपेक्षित आहे.

## १.२ संशोधनाची गरज

महाविदयालयीन शिक्षणामुळे विशिष्ट विषयातील प्राविण्य मिळवणे विदयार्थिनींना मिळवणे शक्य होत असल्याने त्या त्या विषयात अधिक पारंगतता प्राविण्य मिळवण्यासाठी सखोल अभ्यासाची गरज असते. अशा सखोल अभ्यासासाठी त्यानुसार ग्रंथालयातील ग्रंथसंपदा वेळोवेळी योग्य प्रमाणात उपलब्ध होणे ही विदयार्थिनी वाचक वर्गाची गरज आहे. विदयार्थिनी संख्या व विषयावर क्रमिक तसेच संदर्भ ग्रंथसंख्या यांचे नेहमीच व्यस्त प्रमाण राहील आहे. अगोदरच

वाढलेल्या महाविदयालयीन शिक्षण खर्चाच्या ओझ्याने विदयार्थिनींचे पालक पुस्तके खरेदीस काट - छाट करतात किंवा दुय्यम स्थान देत असल्याने विदयार्थिनींना महाविदयालयाच्या ग्रंथालयावर अवलंबून रहावे लागते. विदयार्थ्यांची वाढती संख्या बघता केवळ विदयार्थिनींना पुस्तक आदान – प्रदानात सवलत देणे ग्रंथालय सेवेसही अशक्य होते.

स्त्री - शिक्षण संवर्धन हा समाज विकासाचा मध्यबिंदू असल्याने या वंचित वर्गास सर्वतोपरी ग्रंथालयीन सोयीसुविधा समस्याविरहीत उपलब्ध करून देणे ही एक ग्रंथालयाची नैतिक जबाबदारी आहे. सध्या ग्रंथालयीन सेवा पध्दतीत काही हेतुपुरसर बदल करणे गरजेचे आहे. हे मला एक स्त्री ग्रंथपाल म्हणून गेल्या ५ वर्षाचा अनुभवाने जाणवत आहे.

विदयार्थिनींना येणाऱ्या समस्या विदयार्थिवर्गाच्या समस्येपेक्षा वेगळया स्वरूपाच्या असतात. त्यांचे निराकरण करणे ही सध्याच्या शिक्षण व्यवस्थेत गरजेची बाब असल्याने "कल्याण शहरातील निवडक महाविदयालयातील ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्यांचा अभ्यास" हा या शोध निबंधाचा विषय म्हणून मी संदर्भ ग्रंथ म्हणून ग्रंथसूची अत्यंत अल्प वा नकारात्मक स्वरूपात उपलब्ध असल्याने कल्याण शहरातील निवडक महाविदयालयातील विदयार्थिनींना समक्ष भेटून सर्वेक्षण पध्दतीने त्यांचे या विषयावर अनुभव, मत, सुचना, अपेक्षा या क्रमाने त्यांच्याशी प्रश्नावलीच्या साहाय्याने मिळवण्याचा प्रयत्न मी या शोध प्रबंधिकेत केला आहे.

## १.३ विदयार्थिनींना महाविदयालयीन ग्रंथालयाबाबत येणाऱ्या समस्या :

सदर संशोधनासाठी कल्याण शहरातील निवडक महाविदयालयातील ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचक वर्गाच्या समस्यांचा अभ्यास केला आहे.

महाविदयालयाचे ग्रंथालय हे एक महत्वाचे व अत्यंत आवश्यक अंग आहे. ग्रंथालय हे शिक्षण प्रक्रियेत महत्वाचा घटक आहे. स्त्री – शिक्षण वृध्दींगत होण्यास ग्रंथालय हे ज्ञान - माहिती स्त्रोतासाठी सतत कार्यरत असते. ग्रंथालयांच्या सेवेत येणाऱ्या विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्या व त्यांचे निराकरण करण्यासाठी सूचना व शिफारशी उद्धृत करणे हा संशोधनाचा प्रमुख हेतु आहे. विविध महाविदयालयांच्या प्रतिनिधीक विदयार्थिनींना भेटुन त्यांच्याशी संवाद साधून त्यातून मिळणाऱ्या सूचनांचे परिक्षण करणे आणि प्रस्तुत समस्या सोडविण्यासाठी उपाय योजना सुचविणे हे संशोधनाचे साध्य आहे.

"सुसंस्कृत समाज बनण्यासाठी ग्रंथांचा मोठया प्रमाणावर उपयोग होतो किंबहुना ग्रंथप्रसारामुळे समाजाची संस्कृती वाढते."

विदयार्थिनी वाचकवर्गाला ज्ञानार्जनाच्या बाबतीत ग्रंथालयातील सेवांमध्ये असलेल्या उणिवा एक अडसर असल्याने त्यातील समस्यांचे निराकरण करण्यास हे संशोधन उपायकारक ठरेल.

स्त्री – वाचक विदयार्थिनी वर्गास अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.विदयार्थिनी वाचकवर्ग ग्रंथालयाचा वापर किती वेळा करतात, ग्रंथालयाचा वापर करतांना त्यांना पुरूषप्रधान समाजात काही त्रास होतो कां, ग्रंथालयामध्ये भौतिक अडचणींच्या समस्या, अध्यापनाच्या वेळी अध्यापक जी माहिती देतात ती माहिती संदर्भग्रंथातून शोधतांना कर्मचारी वर्गाचा प्रतिसाद कसा मिळतो, काही विदयार्थिनी महाविदयालय चालू झाल्यानंतर

प्रवेश घेतात तेव्हा त्यांना ग्रंथालयाची अपुरी माहिती मिळते, वेगळया वाचनकक्षाची सोय, पुस्तकाचे आदान - प्रदान करतांना वेगळी रांग, स्त्री - शिक्षणाबददल पुस्तके, ग्रंथालयीन सेवा देण्याबाबत विदयार्थिनी वर्गाबाबत भेदभाव, वेगळा संगणक कक्ष, ग्रंथालयसमितीमध्ये विदयार्थिनी वर्गाचा समावेश, स्त्री-वर्गाधिष्ठित पुस्तकांची उपलब्धता, प्रकाश व्यवस्था, विदयार्थिवर्गाचा पाठिंबा, कर्मचाऱ्यांची मदत, तक्रार व सूचना पेटीची उपलब्धता व सोयीसुविधा या समस्यांवर त्याचे निराकरण करणे अश्या विदयार्थिनी वर्गाच्या समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

सर्वेक्षणाचा हेतू निष्कर्षाप्रत पोहोचणे हा जरी प्रमुख हेतू असला तरी त्याचा फायदा ग्रंथालय सेवेत अपेक्षीत बदल आणण्यासाठी विदयार्थिनींचा बाबतीत विशिष्ट सोयी व नियम याबाबत शिफारशी हा या संशोधनाचा प्रमुख हेतू आहे. विदयार्थिनींच्या ग्रंथालयीन समस्या व त्याचे सूचनारूपी निराकरण प्रस्ताव, शिफरशींच्या माध्यामातून मांडणे शक्य झाले आहे.

ग्रंथालयासंदर्भात विदयार्थिनींच्या समस्या व त्यांचे निराकरण हा या शोध निबंधाचा उदेद्श असल्याने त्या विषयावर सखोल चर्चा व विचार संक्रमण होणे हे अत्यंत आवश्यक असल्याने त्यावर संशोधन करणे ही प्राथमिक गरज आहे.

समस्या, तक्रारी, सूचना यांची सोडवणूक कशी केली जाते आणि कशी केली पाहिजे यासाठी सर्वेक्षण, उपलब्ध ग्रंथ व उपलब्ध बेबसाइट यांचे सहाय्य घेतले असून त्यावरील संशोधन अधिकाधिक विस्तृत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे विदयार्थिनींसाठी ग्रंथालयीन सेवेत कोणत्या सोयी – सुविधा अपेक्षीत आहेत, याची

कल्पना येईलच. पण विदयार्थिनी म्हणून कोणत्या अडचणी वा समस्या येतात हे देखील आपल्यास विचार करण्यास उद्धृत करेल. म्हणून यावरील संशोधनाची गरज एक स्त्री ग्रंथपाल या नात्याने मला विशेष महत्वाचे वाटले.

शेवटी संशोधनाचा परिणाम हा शिफारशीत परावर्तीत होत असल्याने त्याचे महत्व **'स्त्री शिक्षण - संवर्धन'** प्रक्रियेत अनन्य साधारण आहे. म्हणून केला हा संशोधन प्रकल्प !

## १.४ संशोधनाचा उद्देश व हेतू

प्रस्तुत संशोधनाचा प्रमुख उद्देश कल्याण शहरातील निवडक कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयीन ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्या जाणून घेणे हा आहे.

प्रमुख संशोधनाचा प्रमुख हेतू विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्या जाणून त्यावर उपाय शोधणे हा हेतू आहे.

## १.५ संशोधनाची उदिदष्टये

१) प्रस्तुत संशोधनात अभ्यासासाठी निवडलेल्या महाविदयालयीन ग्रंथालयाच्या समस्यांचे निराकरण करणे.

२) प्रस्तुत संशोधनात विदयार्थिनींसाठी असलेल्या सोयी सुविधांची पाहणी करणे.

३) प्रस्तुत संशोधनात विदयार्थिनी वर्गाच्या समस्या निवारण्यासाठी असलेले आव्हान स्विकारणे.

४) प्रस्तुत संशोधनात महाविदयालयीन विदयार्थिनी वर्गाच्या समस्यांबाबत त्रुटी शोधून उपाय सुचविणे.

## १.६ संशोधनाची गृहीतके

१) प्रस्तुत संशोधनातील ग्रंथालये समृध्द असून ती ग्रंथ व ग्रंथेत्तर साहित्याने विदयार्थिनी वर्गासाठी परिपूर्ण आहेत.

२) ग्रंथालयातील सर्व विभाग कार्यक्षम आहेत व विदयार्थिनी वाचक वर्गास उत्तम सेवा देण्याचा प्रयत्न करतात.

## १.७ संशोधन पध्दती

### १.७.१ वर्णनात्मक संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. वर्णनात्मक पध्दती द्वारा एखादा समाज, सामाजिक घटना तसेच सामाजिक संस्थेच्या एखादया उपक्रमाच्या सदयस्थितीचा अभ्यास करून प्रगतीचा आढावा घेता येतो. कोणत्याही विषयाला ज्ञानाचा दर्जा प्राप्त होण्यासाठी त्या विषयात सातत्याने संशोधन होणे आवश्यक असते. ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची एक स्वतंत्र व महत्वपूर्ण शाखा म्हणून मान्यता पावलेला आहे. या विषयात संशोधनाच्या आधारे सातत्याने सुधारणा व विकास घडत आहे. सामाजिक शास्त्रात वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा फार मोठया प्रमाणात उपयोग करण्यात येतो. **“इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स”** या संस्थेने सुध्दा ग्रंथालय आणि माहिती शास्त्राला

सामाजिक शास्त्र म्हणून मान्यता दिली आहे. त्यामुळे ग्रंथालय आणि माहिती शास्त्रातील बहुतांश संशोधन हे वर्णनात्मकच असते. प्रस्तुत संशोधनामध्ये वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये **वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा** अवलंब करण्यात आलेला आहे. संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे किंवा तथ्ये शोधण्यासाठी तसेच जुनी व नवीन तत्वे, तथ्ये परिक्षणासाठी केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय.

“जुन्या ज्ञानाचे पुर्नःपरिक्षण व नवीन ज्ञानाचे संपादन व त्यासाठी आवश्यक असणारा पध्दतशीर प्रयत्न इत्यादींचा समावेश संशोधनात होतो.”

## १.७.२ नमुना निवड

प्रस्तुत संशोधनामध्ये कल्याण शहरामधील १० महाविदयालयीन ग्रंथालयाची निवड करण्यत आली. कल्याण शहरामध्ये काही महाविदयालय ही कला आणि वाणिज्य शाखेची आहेत. तर काही महाविदयालये ही कला आणि विज्ञान शाखेची आहेत. तर काही महाविदयालये ही वाणिज्य आणि विज्ञान शाखेची आहेत. प्रस्तुत संशोधनाचा विषय हा कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या महाविदयालयीन ग्रंथालयातील वाचकवर्गाच्या समस्या असल्याने मुंबई विदयापीठाशी संलग्नित असणाऱ्या कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील निवडक १० महाविदयालयीन ग्रंथालयाची निवड करण्यात आली आहे. वरील सांगितल्या प्रमाणे कल्याण शहरामध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखा एकत्रित असलेल्या १८ महाविदयालयाची यादी खालीलप्रमाणेः

## १.७.३ कल्याण शहरातील महाविदयालयाची यादी

| अनु. क्र. | महाविदयालयाचे नांव |
|---|---|
| १. | बिर्ला कॉलेज ऑफ आर्टस्, कामर्स ॲण्ड सायन्स बिर्ला कॉलेज रोड , कल्याण (प.) जि. ठाणे पिन : ४२१ ३०१. |
| २. | नूतन ज्ञान मंदीर आर्टस् अॅन्ड कॉमर्स, पुना लिंक रोड, तिसगांव , कल्याण(पू.) पिन : ४२१ ३०२ |
| ३. | नॅशनल उर्दु कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स, आग्रा रोड , कल्याण (प.) पिनः ४२१ ३०१. |
| ४. | लक्ष्मण देवराम सोनावणे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कल्याण (प.) पिन :४२१ ३०१. |
| ५. | साकेत कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स साकेत विदयानगरी मार्ग , चिंचपाडा रोड, काटेमानिवली, कल्याण (पू.) पिनः ४२१ ३०६. |
| ६. | मोहिंदरसिंग काबलसिंग ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स , कल्याण (प.) पिनः ४२१ ३०१. |
| ७. | के. एम . अग्रवाल कॉलेज ऑफ आर्टस्, कामर्स ॲण्ड सायन्स, पडघा रोड, गांधारे, कल्याण (प.) जि. ठाणे पिन : ४२१ ३०१. |
| ८. | हॉली अँजल्स कॉलेज ऑफ आर्टस अॅन्ड कॉमर्स, कल्याण (पू.) पिनः४२१ ३०२. |
| ९. | मॉडेल कॉलेज ऑफ कॉमर्स अॅन्ड सायन्स , राजबर नगर, चिंचपाडा रोड, काटेमानिवली, कल्याण (पू.) पिनः ४२१ ३०२. |
| १०. | सेठ हिराचंद मुथा कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स आधारवाडी जेलरोड, उंबरर्डेगाव, कोलवली कल्याण (प.) पिनः ४२१ ३०१ |
| ११. | हिल स्प्रिंग कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स ,वसंत व्हॅली, गोकुल नगरी कल्याण(प.) पिनः४२१ ३०१. |

| | |
|---|---|
| १२. | हिन्दी हायस्कुल कॉलेज ऑफ आर्टस् अॅन्ड कॉमर्स , जोशी बाग, कल्याण (प.) पिन :४२१ ३०१. |
| १३. | आयडिअल कॉलेज ऑफ आर्टस् , कॉमर्स अॅण्ड सायन्स , हनुमान टेकडी , पुना लिंक रोड , काटेमानिवली, कल्याण (पू.) पिनः ४२१ ३०६. |
| १४. | ल्यूर्डस कॉलेज ऑफ कॉमर्स अॅण्ड सायन्स ,मुरबाड रोड, कल्याण(प.)पिन : ४२१ ३०१. |
| १५. | हॉली क्रास कॉलेज ऑफ कॉमर्स, कर्णिक रोड, कल्याण (प.)४२१ ३०१. |
| १६. | जीवनदीप एज्युकेशन संस्था आर्टस् , कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज , कल्याण (पू.) ४२१ ३०६. |
| १७. | मोहिंदरसिंग काबलसिंग ऑफ आर्टस् , कॉमर्स अॅण्ड सायन्स , कल्याण (प.) पिन :४२१ ३०१. |
| १८ | बाबा बोडसे कॉलेज ऑफ आर्टस्,कॉमर्स अॅण्ड सायन्स, पत्रीपुल, कल्याण (पू.) पिन :४२१ ३०६. |

वरीलपैकी अभ्यासात संशोधनासाठी निवडण्यात आलेली मुंबई विदयापीठाशी संलग्नित असलेली क्ला, वाणिज्य आणि सायन्स शाखेची निवडण्यात आलेली १० महाविदयालयाची यादी पुढीलप्रमाणेः

## १.७.४ अभ्यासात घेतलेल्या निवडक महाविदयालयीन ग्रंथालयाची यादी

| अनु. क्र. | महाविदयालयाचे नांव |
|---|---|
| १. | बिर्ला कॉलेज ऑफ आर्टस्,कामर्स ॲण्ड सायन्स बिर्ला कॉलेज रोड, कल्याण (प.) जि. ठाणे पिन : ४२१ ३०१. |
| २. | के. एम. अग्रवाल कॉलेज ऑफ आर्टस्, कामर्स ॲण्ड सायन्स,पडघा रोड,गांधारे, कल्याण (प.) जि. ठाणे पिन : ४२१ ३०१. |
| ३. | नॅशनल उर्दु कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अॅन्ड सायन्स, आग्रा रोड,कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१. |
| ४. | साकेत कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स साकेत विदयानगरी मार्ग, चिंचपाडा रोड, काटेमानिवली कल्याण (पू.) पिनः ४२१ ३०६. |
| ५. | आयडिअल कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, हनुमान टेकडी, पुना लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण (पू.) ४२१ ३०६. |
| ६. | जीवनदीप एज्युकेशन संस्था आर्टस् , कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज ,कल्याण (पू.) पिनः ४२१ ३०६. |
| ७. | मोहिंदरसिंग काबलसिंग ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१. |
| ८. | लक्ष्मण देवराम सोनावणे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१. |
| ९. | सेठ हिराचंद मुथा कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स आधारवाडी जेलरोड, उंबरर्डेगाव, कोलवली कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१. |
| १०. | बाबा बोडसे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स,पत्रीपुल, कल्याण (पू.) पिन : ४२१ ३०६. |

### १.७.५ जनसंख्या

प्रस्तुत संशोधनाकरीता १० महाविदयालयातील एकूण विदयार्थिनी संख्या १९,८९१ त्यापैंकी ३६२७ विदयार्थिनींना प्रश्नावली देण्यात आली. यापैंकी १२२६ (३३.८०%) विदयार्थिनींचा प्रतिसाद प्राप्त झाला.

### १.७.६ प्रश्नावलीचे स्वरुप

प्रश्नावलीचे स्वरूप प्रस्तुत संशोधनात अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या महाविदयालयामध्ये एकूण विदयार्थिनी संख्या १९,८९१ अशी होती. त्यापैंकी ३६२७ प्रश्नावली हया कल्याण शहारातील निवडक महाविदयालयातील विदयार्थिनींना देण्यात आल्या. त्यापैंकी १२२६ प्रश्नावली भरून दिल्या. म्हणजेच **३३.८०%** विदयार्थिनींनी त्या भरून परत केल्या त्याआधारे प्रस्तुत संशोधनात विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्यांचे अनुमान काढण्यात आले आहे.

## १.८ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

### संशोधनाची व्याप्ती

संशोधनाची उदिद्ष्टये साध्य करण्यासाठी संशोधनाची व्याप्ती व मर्यादा निश्चित करणे अत्यंत आवश्यक असते. संशोधनाला निश्चित व्याप्ती व मर्यादा ठरवली नसल्यास संशोधनासाठी आवश्यक असणारी लक्ष्ये संकलीत करणे कठीण होऊन बसते. तसेच एखादा निश्चित समुदाय अथवा सामाजिक वर्ग सुध्दा असू शकतो. अभ्यासासाठी निवडलेल्या समुदाय अथवा वर्ग, भौगोलिक क्षेत्रातील अभ्यासासाठी निवडलेल्या घटकाच्या कोणत्या पैलूचे अध्ययन करण्यात येणार आहे. त्याची व्याप्ती व मर्यादा ठरवणे आवश्यक असते, अन्यथा संशोधन दिशाहीन होईल व ज्या घटकांचा अभ्यास करावयाचा आहे त्या घटकांचा योग्य प्रकारे अभ्यास होऊ

शकणार नाही. प्रस्तुत संशोधन हे कल्याण या भौगोलिक क्षेत्रातील निवडक अशा महाविदयालयातील ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्या या अभ्यासापुरते मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधनात मुंबई विदयापीठाशी संलग्नित असणाऱ्या कल्याण शहरातील निवडक १० कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयाच्या अभ्यासापुरता मर्यादित आहे.

### संशोधनाची मर्यादा

१. कल्याण येथील संशोधनासाठी निवड केलेल्या १० महाविदयालयीन ग्रंथालयाच्या वापरांबाबत विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

२. प्रस्तुत संशोधनामध्ये महाविदयालयीन ग्रंथालयाची माहिती ही ३१-३-२०१५ अखेरची आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेशित विदयार्थिनींचा अभ्यासासाठी विचार केला आहे.

## १.९ संशोधनासाठी माहिती संकलनाची तंत्रे व साधने

सामाजिक संशोधनात तथ्य संकलनाला विशेष महत्व आहे. ग्रंथालय व माहिती शास्त्र हा सामाजिक शास्त्रामध्ये गणला जाणारा विषय आहे. त्यामुळे सामाजिक शास्त्रामध्ये ज्या पध्दतींचा अवलंब केलेला असतो. सर्वसाधारणपणे त्याच पध्दतीचा उपयोग या विषयामध्ये केला जातो. तथ्ये हिच संशोधनाचा आधार असतात. ‘गुड आणि हॅट’ यांच्यामते तथ्ये एक अनुभव सिध्द सत्यपनीय निरीक्षण आहे. संशोधनामध्ये महत्वाचे स्थान असलेल्या तथ्यांचे शास्त्रीय पध्दतीने संकलन करणे आवश्यक असते. सर्वसाधारणपणे तथ्ये संकलीत करण्यासाठी निरीक्षण , प्रश्नावली , मुलाखत इत्यादी साधनांचा उपयोग केला जातो.

संशोधनामध्ये उदिदष्टांनुरूप विविध प्रकारची गुणात्मक व संख्यात्मक माहिती संक्लीत करावी लागली. प्रस्तुत संशोधनामध्ये विदयार्थिनी वाचकवर्गाला प्रश्नावली देण्यात आली. प्रस्तुत माहिती संक्लनासाठी प्रश्नावली या साधनांचा उपयोग केला.

## १.९.१ विदयार्थिनी वाचक वर्गासाठी प्रश्नावली

प्रस्तुत संशोधनात संशोधनासाठी निवडलेल्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयातील विदयार्थिनींना प्रश्नावली देऊन त्यांच्या महाविदयालयीन ग्रंथालयात येणाऱ्या समस्यांबदद्ल आवश्यक माहिती संक्लीत करण्यात आलेली आहे.

## १.१० अभ्यासाची रचना

प्रस्तुत संशोधनात एकूण ६ प्रकरणांचा समावेश केला असून त्यामध्ये प्रमुख बाबींचा अभ्यास मांडण्यात आला आहे.

### प्रकरण १. प्रस्तावना

स्त्री –शिक्षणाबदद्ल माहिती दिलेली आहे. विदयार्थिनींना ग्रंथालय सेवेत जास्तीत - जास्त सोयी उपलब्ध केल्यास त्यांचे सक्षमीकरण तर होईलच व त्याचबरोबर अनेक व्यावसायिक दालने उपलब्ध होतील अश्या समस्या जाणून अभ्यास करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधनाची गरज, संशोधनाची उदधिष्टये, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन पध्दती, संशोधनाची माहिती संक्लनाची तंत्रे व साधने व व्यावसायिक दृष्टीकोनातून गरज हया बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे.

## प्रकरण २.    संदर्भसाहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासाकरीता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संदर्भसाहित्याचा आढावा घेण्यात आला आहे.

## प्रकरण ३.    कल्याणचा  शैक्षणिक इतिहास

प्रस्तुत प्रकरणात कल्याण शहराबदद्ल माहिती, शिक्षणाचा प्रसार हयाबदद्ल माहिती दिलेली आहे. अभ्यासात घेतलेल्या महाविदयालयाची यादी व त्यांची माहिती दिलेली आहे.

## प्रकरण ४.    माहितीचे संकलन ,विश्लेषण आणि सादरीकरण

प्रस्तुत प्रकरणात विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्यांचे प्रश्नावलीद्वारा विश्लेषण केले आहे.

## प्रकरण ५.    निष्कर्ष , शिफारशी, सारांश व पुढील संशोधनास दिशा

प्रस्तुत प्रकरणात विदयार्थिनी वाचकवर्गाच्या प्रश्नावलीद्वारा निष्कर्ष, शिफारशी व सारांश काढण्यात आले आहेत. समस्यांचे विश्लेषण करून पुढील संशोधनास दिशा निश्चित करण्यात आली आहे.

## प्रकरण ६. संदर्भ ग्रंथसूची , प्रश्नावली आणि महाविदयालयीन ग्रंथालयाची माहिती

प्रस्तुत प्रकरणात संदर्भ ग्रंथसुची व विदयार्थिनी वाचक्वर्गासाठी प्रश्नावली मांडण्यात आली आहे. कल्याण शहारातील निवडक मुंबई विदयापीठाशी संलग्नित असलेल्या क्ला, वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयीन ग्रंथालयाची यादी दिलेली आहे.

पुढील प्रक्णांत संदर्भसाहित्याचा आढावा याबददल विवेचन केले आहे.

# प्रकरण दुसरे

# संदर्भसाहित्याचा आढावा

## २.१ पार्श्वभूमी

कुठल्याही विषयात संशोधन करण्यापूर्वी आधी दुसऱ्या संशोधकाने त्याविषयावर संशोधन केले आहे की नाही याची खात्री करून घेणे आवश्यक आहे, कारण झालेल्या विषयावरच परत संशोधन झाले तर श्रम, वेळ व पैसा वाया जातो असे होऊ नये म्हणून संशोधनासंबंधी विविध ठिकाणाहून माहिती गोळा करावी लागते सदर संशोधिकेस असे लक्षात आले की, विविध महाविदयालयीन ग्रंथालयावर वेगवेगळया प्रकारचे संशोधन झाले आहे. कल्याण शहरातील निवडक कला , वाणिज्य आणि विज्ञान महाविदयालयीन ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचक वर्गाच्या समस्या : एक अभ्यास या विषयावर संशोधन झालेले नाही. पूर्वी झालेल्या कार्याचा शोध घेण्याकरीता दीर्घ प्रयत्नांची गरज असते, त्यामुळे संशोधकाचे कार्य पध्दतशीर व सफल होण्यास मदत होते. संशोधनात संशोधकाला त्याच्या विषयांबदद्ल अदयावत माहिती असणे आवश्यक असते.

संशोधन करीत असतांना संबधीत विषयासंदर्भात पूर्णतः संशोधन व्हावे, या विषयासंदर्भात इतर किती व कश्यापकारे संशोधन झाले हे समजण्यासाठी पूर्वी झालेल्या कार्याचा अभ्यास करणे गरजेचे असते. संशोधनाचा विकास निश्चित केल्यापासून संशोधनशास्त्र महाविदयालयीन ग्रंथपाल या विषयावरील विविध ग्रंथाचा वापर या विषयातील संकल्पना समजावून घेण्यासाठी करावा लागला.

## २.२ राष्ट्रीय संदर्भसाहित्याचा आढावा

१. गुल सुमीर आणि अहमद शाह तारीक, अहमद सुहैल (२०१४)[१] सदर संशोधनात डिजिटल वापराचा ग्रंथालयाबाबत प्रभाव यांचा अभ्यास करण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर , ऑनलाईन वाचकवर्ग शैक्षणिक ग्रंथालयात त्याची तुलना हयाचे विश्लेषण करण्यात आले आहे. शैक्षणिक ग्रंथालय आणि इलेक्ट्रॉनिक साधने हयांच्या वाचकवर्गाचा अभ्यास आणि इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर कश्याप्रकारे केला जातो याबदद्ल संबंध दर्शविला आहे.

२. राकेश कुमार भट आणि अमितकुमार (२०१४)[२] सदर संशोधनात सोशल नेटवर्कींग साधनांचा वाचकवर्गाच्या ग्रंथालयातील सेवा व वापर यांचा अभ्यास करण्यात आला आहे. ग्रंथालयातील साधनांचा वापर आणि सोशल नेटवर्कींग संदर्भातील साधने हयांच्या माध्यमातून ग्रंथालयातील मत मांडले आहे. ग्रंथालयातील वाचकवर्गाने ग्रंथालयातील साधनांचा वापर करून त्याबाबतीत कोणत्या इलेक्ट्रॉनिक सेवा दिल्या पाहिजेत हे सदर संशोधनात नमूद केले आहे. हया अभ्यासासाठी नवी दिल्लीतील ग्रंथालय निवडण्यात आले.

३. शिवकुमार आणि रंजना व्होरा (२०१२)[३] सदर संशोधनात वाचकवर्गाचा OPAC कॅटलॉगचा वापर कश्यारीतीने केला जातो हे दर्शविले आहे. भारतातील विदयापीठातून ऑनलाईन कॅटलॉगद्वारे माहिती मिळवणे. सदर अभ्यासात तीन विदयापीठांचा समावेश करण्यात आला आहे. चंदीगड , पंजाब आणि भारत उत्तरेकडील राज्यात केंद्रशासित प्रदेश यांमध्ये तुलनात्मक विश्लेषण केले आहे. तीन विदयापीठात OPAC कॅटलॉगचा वापर नियमित केला जातो. तीन वेगवेगळया ग्रंथालयात OPAC च्या पैलू संबंधित माहिती गोळा करण्यात आली.

४. सारीका सावंत (२०१२)[४] सदर संशोधनात ग्रंथालयातील संप्रेषणाचा वापर व अनुभव यांचा अभ्यास करण्यात आला आहे. संबंधित अभ्यासात भारतातील वाचकवर्गाचा अनुभव व मते मांडण्यात आली आहेत. सॉफ्टवेअरच्या मदतीने माहिती संकलित करून वेब प्रश्नावली तयार करण्यात आली आहे. संशोधन करतांना संप्रेषण करणे सोपे वाटले.भारतीय ग्रंथालयात वाचकवर्गाचा अभ्यास व निष्कर्ष यांची तुलना करण्यात आली आहे. संशोधनाच्या उददेशाने छापील नियतकालिके आणि माहितीचा संग्रह हयांच्या दृष्टीकोन सामाजिक फरक लक्षणीय आहे. संबंधित वाचकवर्गाचा अभ्यास प्रत्यक्ष परिस्थितीवर आधारित आहे. वाचकवर्गाच्या विविध प्रकारच्या ग्रंथालय सेवा हयासाठी वापरण्यात आला आहे.

५. जयचंद्रा बैरी आणि बी.मुरली मनोहर (२०११)[५] सदर संशोधनात आउटसोर्स सेवा वाचकवर्गासाठी कशी वापरली जाते याबददल नमूद केले आहे. आउटसोर्स आयटी सेवा गुणवत्ता आणि ग्रंथालयातील वाचकवर्ग हयांमध्ये संशोधन केले आहे. आयटी सेवा ही वाचकवर्गासाठी चांगली परिणाम करणारी आहे. वाचकवर्गाचे समाधान व सेवा आदान प्रदान करण्याचे कार्य केले जाते. वाचकवर्गासाठी ही अतिशय समाधान देणारी बाब आहे. माहिती व्यवस्थापन घटकाचा अभ्यास सदर साहित्यात केला आहे.

६. पी.एम.नौशाद अली आणि फैजल निशा (२०११)[६] सदर संशोधनात विज्ञान ग्रंथालयात दिल्ली विदयापीठयाच्या ई - जर्नल्सचा वापर करणाऱ्या वाचक अभ्यास करण्यात आला आहे. प्राथमिक माहिती संशोधनासाठी वापरण्यात आली आहे. प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली संशोधन विद्वानांना देण्यात आली. विज्ञान ग्रंथालयातील छापील जर्नल्सच्या तुलनेत ई - जर्नल्सचा वापर वाचकवर्गाच्या प्रमाणात किती हयाचा अभ्यास करण्यात

आला आहे.संशोधन विदवानांना ई – जर्नल्सचा वापर अधिक लोकप्रिय असला तरी PDF फाईल्स खूप उशीराने डाउनलोड होते. त्यामुळे वाचकवर्गाची मोठी समस्या निर्माण होत आहे.

७. एन.के.शिजा (२०१०)[७] सदर संशोधनात विज्ञान आणि सामाजिक विज्ञान संशोधन विद्वानांचा प्रभावीपणा, स्तोत अदयावत ठेवणे, विविध पद्धतीने विविध पातळींवर माहितीचे परिक्षण करणे ,संशोधनाच्या उददेशाने छापील नियतकालिके आणि माहितीचा संग्रह हयांचा दृष्टीकोन सामाजिक फरक लक्षणीय आहे. संबंधित वाचकवर्गाचा अभ्यास प्रत्यक्ष परिस्थितीवर आधारित आहे. वाचकवर्गाच्या विविध प्रकारच्या ग्रंथालय सेवा हयासाठी वापरण्यात आला आहे.

८. मरगम मधूसूदन (२००७)[८] सदर संशोधनात दिल्ली विदयापीठातील संशोधन विदवान व्याख्यात्यांचा म्हणजेच वाचकवर्गाचे परिक्षण केले आहे. संशोधन कामात त्यांना समस्या आल्यावर इंटरनेटच्या माध्यामातून माहिति देण्याचा प्रयत्न केला आहे. सदर अभ्यासासाठी प्रश्नावली, निरिक्षण व मुलाखत हया तंत्रांचा वापर केला आहे. दिल्ली विदयापीठातील विद्वान व्याख्यांत्यांचा अभ्यास करण्यासाठी माहिती संकलित केली आहे. इंटरनेटचा वापर वाचकवर्गासाठी एक व्यापक अभ्यास आहे. त्यासंबंधित योजना, इंटरनेट कार्यक्षम असणे गरजेचे आहे.

९. तामार सादेह (२००७)[९] सदर संशोधनात ग्रंथालयातील माहितीचे संशोधक व माहिती विक्रेत्यांसाठी ग्रंथालयात वेब २.० तंत्रज्ञानाची उपलब्धता करण्यात आली आहे. वाचकवर्गासाठी ग्रंथालय हा केंद्रित घटकअसून ग्रंथालयात विविध माहितीचे विश्लेषण केले आहे. ग्रंथालयात माहितीचे संशोधक गरजा पूर्ण करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाद्वारे संग्रहित करतात. संस्थांचा त्यांच्या ग्रंथालयातील वापर कमी होताच वाचकवर्गाच्या सेवा व सुविधांनुसार

आजच्या माहितीच्या आधारे गरजा कश्या पुरविल्या पाहिजेत. हे सदर संशोधनात नमूद केले आहे.

**१०.** निकोसे, सत्यप्रकाश (२००७)[१०] सदर संशोधनात ग्रंथालय व माहितीशास्त्रातील संशोधन त्याची व्याख्या संशोधनाची आवश्यक्ता , संशोधनाचा आराखडा, संशोधन पध्दती तसेच संशोधनातील ग्रंथपालांची भुमिका, संशोधनासाठी घ्यावयाचा पूर्वसाहित्य शोध त्यांचे महत्व याबदद्ल विवेचन केलेले आहे. सदर ग्रंथाचा उपयोग ग्रंथालय व माहितीशास्त्र संशोधनाची आवश्यक्ता, संशोधनाचा आरखडा, संशोधनासाठी पूर्व साहित्यशोध कसा घ्यावा, त्याचे महत्व इत्यादी माहिती समजून घेण्यासाठी झाला. पृ.क्र २१ ते ३८ साहित्याचा अहवाल लेखनाविषयी पूर्ण मिळाली . पृ.क्र. ५८ ते ६८ संशोधन आरखडयाबददल माहिती मिळाली.

११. के. टी. अनुराधा आणि एम.एस.उषा (२००६)[११] सदर संशोधनात ई - बुक्साचा संशोधन व शैक्षणिक कार्यात वापर याचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. विदयार्थिवर्गासाठी असलेल्या अनेक विदयाशाखा आणि कर्मचाऱ्यांसाठी नविन तंत्रज्ञान वापरण्यासाठी सूचित केले आहे. ई - पुस्तकांमध्ये संदर्भसाहित्य आणि तांत्रिक साहित्याचा वापर केला आहे. संशोधन आणि शैक्षणिक कार्यात ई - मेल करणे, इंटरनेट ब्राउझिंग इत्यादीचा समावेश करण्यात आला आहे. ई - पुस्तकांचा वापर हा सॉफ्टवेअर व हार्डवेअरच्या दृष्टीने गरज दर्शविण्यात आली आहे.

१२. ललित के. सामी आणि एन.बी.पंगानिआ (२००६)[१२] सदर संशोधनात ग्रंथालयातील वाचकवर्गाचा माहिती तंत्रज्ञानांच्या परिणामांचे पुनरावलोकन करणे. माहिती तंत्रज्ञानाने ही ग्रंथालयातील समस्या समजून घेणे. ग्रंथालयातील वाचकवर्गास माहिती ही तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पुरवली जाते. वाचकवर्गासाठी तंत्रज्ञानविषयक प्रगतीने समाजावर मात करण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते. विविध माध्यमातून माहिती गोळा करून ती माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्रंथालयात पुरवली जाते. त्या दरम्यान, येणाऱ्या समस्या व त्यांचे परिणाम हयांचा अभ्यास करण्यात आला आहे.

१३. जेस्टिन आणि परमेश्वरी (२००२)[१३] सदर संशोधनात संगणक व नविन तंत्रज्ञान हयांचा परिचय करण्यात आला आहे. सर्व ग्रंथालयासाठी हे एक आव्हान होते. ग्रंथालयाची निर्मिती व गुणवत्ता , शिक्षण माहिती व ज्ञान वितरीत प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ग्रंथालयातील वाचकवर्ग सदैव तत्पर असला पाहिजे. ग्रंथालयात माहितीचे ज्ञान होणे आवश्यक आहे.

१४. श्री निवासू (२०००)[१४] सदर संशोधनात डिजिटल माहिती प्रणाली व्यवस्थापनात डिजिटल ग्रंथालयात ग्रंथपालांच्या भूमिकांचा अभ्यास करण्यात आला आहे. पुढील पिढीसाठी डिजिटल ग्रंथालय डिजिटल वाचनालये , त्यांचे व्यवस्थापन हयाबाबींचा अभ्यास करण्यात आला आहे. ग्रंथालयाचे डिजिटायझेशन, साठवणूकक्षमता, ज्ञानातील थर, संदर्भसेवा, इलेक्ट्रॉनिक माहितीसेवा हयांच्या संग्रह व्यवस्थापनात करण्यात आला आहे. त्यासाठी ग्रंथालयातील वाचकवर्ग हा इंटरफेस डिझाईन प्रोगामिंग व वेब तंत्रज्ञान अवगत असलेला पाहिजे.

१५. अंमूदावली ए. (१९९७)[१५] सदर संशोधनात माहिती तंत्रज्ञानाच्या वातावरणात ग्रंथालयातील साहित्य विकासाच्या व्याख्या देऊन तसेच पारंपारिक साहित्य असलेल्या ग्रंथालयात आधुनिक तंत्रज्ञान युक्त ई - स्वरूपात प्रकाशित संग्रहात विकास करता येणाऱ्या समस्या व त्याचे निराकरण

यावर चर्चा केली आहे. सदर लेखाचा उपयोग भारतासारख्या विकसनशील देशातील शिक्षण क्षेत्रातील पारंपारिक साहित्य संग्रह असलेल्या ग्रंथालयात या आधुनिक माहिती तंत्रज्ञानयुक्त अशा ई - स्वरूपातील साहित्य संग्रहाचा येणाऱ्या समस्या समजुन घेण्यासाठी या संदर्भातील माहिती जाणुन घेण्यास मदत झाली.

## २.३ आंतरराष्ट्रीय संदर्भसाहित्याचा आढावा

१. Angeliki Giannopoulou , Giannis Tsakonas , (2015)[१६] सदर संशोधनात शैक्षणिक ग्रंथालय व देशाचा शैक्षणिक प्रणाली निवडक घटक आर्थिक आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे मानले जाते. वाचकवर्गाच्या सेवा त्यांना ग्रंथालयातील व्यवस्थापनाद्वारे दिल्या जातात. सदर साहित्याचा मुख्य उददेश निकष श्रेणी म्हणजेच खर्च , जागा आणि वापर हयांचा ग्रंथालयातील वाचकवर्गाचा शैक्षणिक पातळीवर मत मोजणे हा आहे.

२. Lili Luo , Viscount B. Buer ,(2015)[१७] सदर संशोधनात संदर्भ मूल्यमापनाचा अभ्यास सविस्तर प्रदान केला आहे. वाचकवर्गाच्या दृष्टीकोनातून संदर्भसेवा मूल्यमापन करण्यासाठी वाचकवर्गासाठीचा वापर कसा होतो आणि सेवा आकलन कशी केली जाते हयासंदर्भात मांडण्यात आली आहे. वाचकवर्गाची सेवा माहितीसाठी गुणविशेष होती. वाचकवर्गाला संदर्भ वाचनालयाची आवश्यक अशी माहिती असते. त्या शैक्षणिक ग्रंथालयात संदर्भ सेवा वाचकवर्गाच्या दृष्टीकोनातून मूल्यांकित केल्या जातात.

३. Robert A. Seal , (2015)[१८] सदर संशोधनात वाचनालये आणि ग्रंथालय व्यावसायिक वाचक वर्गाच्या गरजा भागविण्यासाठी अनेक आव्हाने स्वीकरण्यात आली आहे. गेल्या १५ अधिक वर्षे महाविदयालयासाठी व विदयापीठ ग्रंथालयात 'ग्रंथालय जागा' हया दृष्टीने बऱ्याच प्रमाणात घट झाली आहे. म्हणून शैक्षणिक ग्रंथालयात वाढ करून ही संकल्पना वाढीस लावणे हा मुख्य उददेश आहे. वाचकवर्गासाठी तंत्रज्ञान, गट काम, सामाजिक सुसंवाद आणि ज्ञान निर्मिती आवश्यक तयार करण्यात आले आहे.

४. Huvila Isto , (2013)[१९] सदर संशोधनात व्यावसायिक माहितीचा संदर्भ आणि माहिती पध्दती वाचकवर्गास ग्रंथालयात परिणाम दर्शवितात. ग्रंथालयतील व्यावसायिक माहितीतील संवाद अन्वेषण करण्याचा मुख्य उददेश आहे. वाचनालयांचा माहिती पध्दतीत वाचकवर्गाच्या कल्पना त्या विशिष्ट माहिती प्रणालीत पध्द्तशीरपणे माहितीचा संच तयार करून मांडण्यात आल्या आहेत.

५. Charles N. Nzivo, (2012)[२०] सदर संशोधनात प्रौढ वाचकवर्गाच्या प्रशिक्षण सेवा आणि सार्वजनिक वाचनालय सेवा यांचे प्रभावी व्यवस्थापन वाढविण्यासाठी ग्रंथालय व माहितीसेवा कश्या प्रकारे जातात हे केनिया सार्वजनिक ग्रंथालयातील अभ्यासात मांडण्यात आले आहे. वाचकवर्ग एक विशिष्ट माहितीवर शोध करतील. सामान्य वाचन आणि संशोधनाच्या हेतूने माहिती स्तोत्र सकारात्मक होतील. वाचकवर्गाची सेवा आणि माहिती संसाधन सुधारणा आवश्यक आहे.

६. John Walsh, (2011)[२१] सदर संशोधनात डिजिटल ग्रंथालयात लायब्ररी ऑफ कॉंग्रेस शीर्षकाचा ग्रंथालयातील वापर दर्शविला आहे. ग्रंथालयातील वाचकवर्गाचे फायदे आणि तोटे स्पष्ट केले आहेत. डिजिटल ग्रंथालयाचा वापर वाचकवर्गासाठी आणि लायब्ररी ऑफ कॉंग्रेस शोधाची कार्यक्षमतेत सुधारणा

करून वाचकवर्गासाठी उपलब्ध केली आहे. डिजिटल संग्रहाचे ज्ञान विश्व असलेली प्रसिध्दी जी इंटरनेटद्वारे Cyberspace मध्ये आढळते. माहिती मिळवण्यासाठी लायब्ररी ऑफ कॉंग्रेस मोठया प्रमाणावर वापर करतांना त्यांच्या अडचणी आणि ऑनलाईन त्यांची माहिती मिळवण्याबाबत प्रभावीपणा मांडण्यात आला आहे.

७. Kuan-nien Chen, Pei-chun Lin, (2011)[२२] सदर संशोधनात माहिती साक्षरतेची वैशिष्टये नमूद करण्यात आली आहेत. माहिती साक्षरता भूमिकेची विदयापीठ ग्रंथालयात उत्तम अंमलबजावणी केली आहे. संशोधकाचे सर्वेक्षण केले आहे. माहिती साक्षरता आणि ग्रंथालयातील वाचकवर्ग हयांचा शैक्षणिक क्षेत्रातील प्रकाशनाचा आढावा घेण्यात आला आहे. माहिती साक्षरता ग्रंथालयीन कर्मचारी, प्राध्यापक आणि विदयार्थिवर्गास सोयीस्कर आहे.

८. Marzena Swigoń, (2011)[२३] सदर संशोधनात ग्रंथालयातील माहितीच्या अडथळयांचा प्रायोगिक अभ्यास करण्यात आला आहे. सदर अभ्यासात लिंग, अभ्यासाचे क्षेत्र (सामाजिक विज्ञान, मानवी विज्ञान, नैसर्गिक विज्ञान आणि तांत्रिक विज्ञान) वय,विज्ञान पदवी, अभ्यासाचे वर्ष असे गट सर्वेक्षणात विभागून वाचकवर्गाच्या माहितीतील अडथळयांचे विश्लेषण केले आहे. माहिती सांख्यिकीय पध्दतीने मांडण्यात आली आहे. ग्रंथालयातील माहिती अडथळयांसाठी ग्रंथालयातील वाचकवर्ग सक्षम असणे गरजेचे आहे. विदयार्थि वाचकवर्गापेक्षा विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्या माहिती अडथळयांबाबतीत गंभीर आहे. वाचनालये आणि ग्रंथालयातील वाचकवर्गाचे योग्य विश्लेषण करण्यात आले आहे.

९. Tiong T. Goh, Chern Li Liew, (2009)[२४] सदर संशोधनात वाचकवर्गाची मानसिक्ता आणि वापरण्यासाठी संदेश सेवा हयाचा ग्रंथालयीन तपास हा मुख्य उददेश आहे. सदर संशोधनात मोबाईल माहिती प्रणाली आणि

एसएमएस ग्रंथालयातील वाचकवर्गाच्या सेवा वाढविण्यासाठीच्या तंत्रज्ञानाचे अन्वेषण करण्याची गरज अभ्यासण्यात आली आहे. एसएमएस आधारीत ग्रंथालयीन सेवा आणि ग्रंथालयातील साहित्याचा आढावा एसएमएस आधारीत ग्रंथालयाच्या यादी प्रणालीत तंत्रज्ञानाचा वापर करून वाचकवर्गाच्या समस्यांवर तोडगा काढून विकसित केले हयाचा अभ्यास करण्यात आला आहे.

१०. Golnessa Galyani Moghaddam, Mostafa Moballeghi, (2008)[२५] सदर संशोधनात सकल गुणवत्ता व्यवस्थापनाचा आढावा घेण्यात आला आहे. ग्रंथालयातील माहिती क्षेत्रात सकल गुणवत्ता व्यवस्थापनाची अमंलबजावणी करणे हे लक्ष केंद्रित करून ग्रंथालयातील अनुभवाचे पुनरावलोकन केले आहे. प्रारंभी माहितीच्या क्षेत्रात सकल गुणवत्ता व्यवस्थापन हे तत्वज्ञान लागू करण्यात आले. ग्रंथालयातील वाढत्या सेवा क्षेत्रात सकल गुणवत्ता व्यवस्थापनाचा अवलंब करण्यात आला आहे. ग्रंथालयात एकूण दर्जात्मक व्यवस्थापन, ग्रंथालयातील व्यवस्थापन व ग्राहक सेवांची गुणवत्ता हयासंबंधी वाचकवर्गाचा इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचा वाचकवर्गाचा वापर ही संकल्पना दर्शविली आहे.

११. Jela Steinerová, Jaroslav Susol, (2005)[२६] सदर संशोधनात ग्रंथालयातील वाचकवर्ग आणि माहिती सुसंघटित करून इलेक्ट्रॉनिक माध्यमावर भर देणे आहे. छापील ग्रंथ आणि ई -प्रकाशन हयांच्या क्षमता समान आहे. दोन प्रकारच्या वाचकवर्गाच्या माहितीतून माहितीचे विश्लेषण केले आहे. छापील माहितीचा खर्च आणि ई - प्रकाशनाचा खर्च हयांमधील तौलनिक संबंध दर्शविला आहे.

१२. F.O. Ajegbomogun, (2004)[२७] सदर संशोधनात ग्रंथालयातील साहित्य जमा व विश्लेषण केले आहे. ग्रंथालयातील सुरक्षा आणि घटकांच्या मूल्यांकनाचा प्रभाव हयांचा नायजेरियन विदयापीठांतील वाचकवर्गाचा हयाचा अभ्यास करण्यात आला आहे. माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली तंत्राचा अवलंब करण्यात आला आहे. ग्रंथालयातील ग्रंथाचा वाचकवर्गासाठी वापर आणि सुरक्षा हयाचा अभ्यास करण्यात आला आहे.

१३. E. E. Nkereuwem, Uwem Eteng, (1994)[२८] सदर संशोधनात माहिती मिळवण्यासाठी बौध्दिक क्षमता आणि विविध पध्दतीत ग्रंथालयातील एकाग्रतेने अभ्यास हया संबंधित मांडण्यात आले आहे. सांख्यिकीय पध्दतीने ग्रंथालयातील मूल्यमापन आणि व्यवस्थापनाचा अवलंब करण्यात आला आहे. पुस्तकांची भौतिक उपलब्धता आणि व्यवस्थापकीय पुस्तकांच्या उपलब्धता वाचकवर्गासाठी करण्यात आली आहे. ग्रंथालयातील जागा, पुस्तकांचा खर्च, कामगारांची भरती निवड आणि ग्रंथालय सेवा इत्यादी पैलू हयांचे ग्रंथालय व्यवस्थापनातील योगदान दर्शविण्यात आले आहे.

१४. W.B. Adeoti-Adekeye, (1997)[२९] सदर संशोधनात माध्यमिक शाळांच्या वाचकवर्गातील शिक्षणाचे महत्व पटवून दिले आहे. वाचकवर्गाचे शिक्षण कार्यक्रमापासून derivable फायदे नमूद केले आहेत. माहिती आणि अभ्यास कौशल्य वाचनालयासाठी यशस्वी वापर दर्शविला आहे. शैक्षणिक ग्रंथालयात प्रभावी वाचकवर्गाच्या दृष्टीने शैक्षणिक ग्रंथालयात प्रभावी वाचकवर्गाच्या दृष्टीने शैक्षणिक कार्यक्रमाद्वारे पहिले पाऊल टाकून शाळांमध्ये शैक्षणिक ग्रंथालयात वाचकवर्गासाठी महत्व दिले आहे.

१५. Tom Whitehall,(1992)[३०] सदर संशोधनात गुणवत्ता, दर्जात्मक साहित्याचे पुनरावलोकन केले आहे. ग्रंथालय व्यवस्थापनाच्या दृष्टीने गुणवत्ता, दर्जात्मक मूल्यमापनाचे फायदे हयाची ग्रंथालयाच्या दृष्टीने चांगली बाब आहे. त्यांचे मूल्यांकन, स्व–मूल्यांकन आणि वाचकवर्गाचे समाधानाचे सर्वेक्षणाच्या माध्यमातून विश्लेषण केले आहे. गुणवत्ता पध्दतीने निकष काढले आहेत.

## संदर्भसूची


१. गुल सुमीर आणि अहमद शाह तारीक, अहमद सुहैल (२०१४) ग्रंथालयातील इलेक्ट्रानिक साधनांचे विश्लेषण आणि तुलना : वाचकवर्गाचा वापर.

२. राकेश कुमार भट आणि अमितकुमार (२०१४) सोशल नेटवर्कींगच्या साधनांचा ग्रंथालयीन वापरांबाबत वाचकवर्गाचे मतः एक अभ्यास.

३. शिवकुमार आणि रंजना व्होरा (२०१२) OPAC चा वाचकवर्ग आणि वापर

४. सारीका सावंत (२०१२) भारतीय ग्रंथालयातील संप्रेषणःवाचकवर्गाच्या दृष्टीकोनातून अभ्यास.

५. जयचंद्रा बैरी आणि बी.मुरली मनोहर (२०११) आउटसोर्स आयटी सेवा वाचकवर्गासाठीचा माहिती व्यवस्थापन घटकांचा अभ्यास.

६. पी.एम.नौशाद अली आणि फैजल निशा (२०११) केंद्रिय विज्ञान ग्रंथालयातील दिल्ली विदयापीठातील संशोधन विद्वानांचा ई - जर्नल्सचा वाचकवर्गाचा वापर.

७. एन.के.शिजा (२०१०) सामाजिक विज्ञान आणि शैक्षणिक संशोधन माहिती मिळवण्याच्या पध्दती : वाचकवर्गाचा एक अभ्यास.

८. मरगम मधूसूदन (२००७) दिल्ली विदयापीठातील वरिष्ठ व्याख्यातांचा म्हणजेच वाचकवर्गाचा इंटरनेटचा ग्रंथालयातील वापर .

९. तामार सादेह (२००७) एक बदलः ग्रंथालयातील वाचकवर्गासाठी वेब तंत्रज्ञानाच्या वापरण्याच्या पध्दती.

१०. निकोसे , सत्यप्रकाश (२००७) आधुनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन.

११. के. टी. अनुराधा आणि एम.एस.उषा (२००६) संशोधन आणि शैक्षणिक कार्यात ई - पुस्तकांचा वाचकवर्गासाठी वापर.

१२. ललित के. सामी आणि एन.बी पंगानिआ (२००६) माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालय वाचकवर्गासाठी वापर व परिणाम.

१३. जेस्टिन आणि परमेश्वरी (२००२) वाचकवर्गासाठी मिलिनियम ग्रंथालयासाठीची आव्हाने व शोध.

१४. श्री निवासू (२०००) मल्टिमिडियाचा ग्रंथालयाच्या वाचकवर्गासाठी वापर.

१५. अमूदावली ए. (१९९७) इलेक्ट्रॉनिक साहित्याचा ग्रंथालयावर प्रभाव.

१६. Angeliki Giannopoulou , Giannis Tsakonas ,(2015) वाचकवर्गाचा आर्थिक ताण कमी वेळ आणि ग्रंथालयातील भावना संबंधः ग्रंथालयातील व्यवस्थापन.

१७. Lili Luo , Viscount B. Buer ,(2015) आफ्रिकन शैक्षणिक ग्रंथालयात संदर्भसेवा मूल्यमापन : वाचकवर्गाचा दृष्टीकोन.

१८. Robert A Seal ,(2015) २१ व्या शतकात ग्रंथालयात वाचकवर्गासाठी मोकळी जागा, आव्हाने, माहिती तंत्रज्ञान आणि कौशल्य आवश्यकता.

१९. Huvila Isto ,(2013) माहिती प्रणालीः ग्रंथालयातील वाचकवर्गाचा पुस्तकाचा वापर.

२०. Charles N. Nzivo, (2012) केनियाच्या सार्वजनिक ग्रंथालयातील सेवा माहिती स्तोत्रांचा वाचकवर्गाचा समज : ग्रंथालयातील पुनरावलोकन.

२१. John Walsh, (2011) डिजिटल संग्रहाचा लायब्ररी ऑफ काँग्रेस शीर्षकाचा वापर : ग्रंथालयातील वाचकवर्गाचे पुनरावलोकन.

२२. Kuan-nien Chen, Pei-chun Lin, (2011) विदयापीठ ग्रंथालयातील वाचकवर्ग आणि माहिती साक्षरतेचे शैक्षणिक महत्व.

२३. Marzena Swigoń, (2011)ग्रंथालयातील माहितीच्या अडथळयांचा प्रायोगिक अभ्यासाचे वाचकवर्गासाठी विश्लेषण.

२४. Tiong T. Goh, Chern Li Liew, (2009) एसएमएस आधारित ग्रंथालयाची यादी प्रणाली : वाचकवर्गाची स्वीकृती एक प्राथमिक तपास.

२५. Golnessa Galyani Moghaddam, Mostafa Moballeghi, (2008) ग्रंथालयातील माहिती क्षेत्रात एकूण व दर्जात्मक व्यस्थापन : इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयात वाचकवर्गाचा वापर.

२६. Jela Steinerová, Jaroslav Susol, (2005) मानवी माहिती वर्तवणुकीतील ग्रंथालयातील वाचकवर्ग : ऑनलाईन माहितीचे पुनरावलोकन.

२७. F.O.Ajegbomogun,(2004) ग्रंथालयातील वाचकवर्गाचे मूल्यांकन :नायजेरियन विदयापीठाबाबतीत : एक अभ्यास.

२८. W.B. Adeoti-Adekeye, (1997) माध्यमिक शाळा ग्रंथालयातील वाचकवर्गातील शिक्षणातील गरज : ग्रंथालय पुनरावलोकन.

२९. E.E. Nkereuwem, Uwem Eteng, (1994) ग्रंथालय व्यवस्थापनातील ऑपरेशन रिसर्च आणि ग्रंथालयातील पुस्तकांचा वाचकवर्गासाठी वापर: एक अभ्यास.

३०. Tom Whitehall, (1992) ग्रंथालय व माहितीशास्त्र सेवेबददल वाचकवर्गाचा आढावा.

वरील आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संदर्भसाहित्याचा आढावा घेतल्यास असे आढळते की,सदर संशोधनासाठी संशोधकाने घेतलेला विषय पूर्वी कुणीही घेतला नसल्याने हा विषय संशोधनासाठी नवीन आहे. महाविदयालयीन ग्रंथालयासंदर्भात असणाऱ्या विदयार्थिनी वाचकवर्गाच्या समस्या हा विषय कुणीही न घेतल्यामुळे हा विषय नावीन्यपूर्ण असा आहे. सदर साहित्याचा आढावा घेण्यासाठी खालील स्तोत्र वापरले आहे.

Source: http://www.emeraldinsight.com

पुढील प्रकरणांत संशोधन विषयाचे भौगोलिक क्षेत्र कल्याण असल्याने कल्याण शहराबददल शैक्षणिक माहिती दिलेली आहे व स्त्री - शिक्षणाबददल माहिती विशद करण्यात आली आहे. अभ्यासात निवडलेल्या १० कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या महाविदयालयीन ग्रंथालयाची माहिती विशद करण्यात आली आहे.

# प्रकरण तिसरे

# कल्याण शहराबददल माहिती

## ३.१ कल्याणचा शैक्षणिक इतिहास

इतिहासात मौर्य काळापासुन कल्याण शहराचे उल्लेख दिसतात. कल्याण हे नाव फार पूर्वीपासून आहे. इ.स. १०५० मध्ये सुदधा कल्याण हेच नाव प्रचलित असलेले पुरावे सापडलेले आहेत.

**कल्याण शहरातील आकर्षक ठिकाणे :**

१. काळा तलाव , कल्याण (प.)

२. गणेशघाट

३. गणेश मंदिर, टिटवाळा

४. दुर्गाडी किल्ला

५. मलंगगड

६. मेट्रो जंक्शन मॉल

व्यक्तीला व्यक्तीमत्व असते तसे एखादया शहरालाही व्यक्तीमत्व असू शकते का? असा विचार मनात येतो आणि जसजसे निरीक्षण करत जावे तसतसे शहरालासुध्दा

व्यक्तिमत्व असलेले शहर आहे. आज कल्याण - डोंबिवली या दोन शहारांची मिळुन एक महापालिका आहे. मुघल पूर्वी व पेशवे काळात कल्याण भिवंडी ही जोडगावे आहेत. कल्याणला इ.स.पूर्वीचा इतिहास आहे. नागरी जीवन इतिहास पूर्व काळापासून कल्याणमध्ये नांदत होते, याचे पुरावे आहेत.

कल्याण हे बंदर असून मोठया प्रमाणावर व्यापार चालत होते. खोलवर अभ्यास केला तर असे समजले की सर्व तऱ्हेचे आघात पचवूनही कल्याण हे मुंबईचे उपनगर झाले नाही. पु.ल. देशपांडे म्हणतात की, देहू रोड आले की पुणे दरवळते तर कल्याण आले की मुंबईची चाहूल लागते. याचा अर्थ कल्याणनंतर मुंबईचे अस्तित्व जाणवू लागले. म्हणजेच कल्याणला स्वतंत्र अस्तित्व आहे. अधिक एकजीव समाजाचे दर्शन घडविणारे स्वतंत्र व्यक्तिमत्व असलेले हे शहर आहे. कल्याणचा सांस्कृतिक इतिहास वाचत असतांना समाजातील प्रवाह जाणवतात. विविध जाती, धर्म, पंथ भाषा यांच्यातील एकोप्यामुळे कल्याणला दंगलीचा इतिहास नाही, तो यामुळेच प्राचीन काळापासून असलेले कल्याण हे नाव आजतागायत कायम आहे, हे उदाहरण कल्याणचे स्वतंत्र व्यक्तिमत्व स्पष्ट करणारे आहे.

कल्याणची भौगोलिक स्थिती व इतिहास याबरोबरच कल्याण हे रेल्वे जंक्शन असणे ही बाबही कल्याणच्या सामाजिक जीवनावर परिणाम करणारी आहे. राजघराणांच्या दृष्टीने कल्याण हे महत्वाचे शहर असल्याने कल्याणचा व राजघराण्याचा इतिहास आपल्यासमोर येतो. राजकीय व व्यापारी केंद्र एकत्र नांदू लागले की, तो केवळ राजकारण व व्यापार यातच रमत नाही. जीवन समृध्द करणाऱ्या सर्व क्षेत्रात गुणी मंडळी काम करत राहतात आणि त्यांचा अभ्यास करून विविध क्षेत्रातील सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते.

कल्याणचे हे वैशिष्टय आहे की, पोटापुरता उदयोग करून आपल्या आवडीच्या क्षेत्रासाठी सर्ववेळ खर्च करणारा हौशी असा किमान एक धडपडया माणूस

कल्याणला लाभला आहे. कै. काका बर्वे यांना गायनाची आवड होती. देशातील उत्तम गायक कल्याणला आले पाहिजेत आणि त्यांच्या संगीताची मोहिनी कल्याणच्या सुसंस्कृत जीवनावर पडायला पाहिजे यासाठी काकांनी जीवनाचे रान केले आणि सामान्य माणसांच्या प्रयत्नांतून गायन समाजाची वास्तू टिळक चौकात उभी केली . क्रिडा संस्था, गायनसमाज, नाटय संस्था वगैरे साहित्यिक संस्थांनी सार्वजनिक वाचनालय यांनी कल्याणचे सांस्कृतिक जीवन घडवले आहे.

कोणत्याही शहाराच्या सांस्कृतिक जडणघडणीत स्त्रीचा सहभाग हा महत्वाचा असतो. किंबहुना स्त्री ही त्या इतिहासाचा गाभाच असते. स्त्रीच्या कर्तृत्वाचा घेतलेला वेध उल्लेखनीय आहे. प्राचीन सातवाहनकालीन यज्ञ करणाऱ्या स्त्री पासून ते आजपर्यंतच्या कल्याणातील कर्तृत्ववान स्त्रियांची ओळख होते. बाजीरावांच्या पत्नी काशीबाई, आवडाबाई मोरे, सरस्वती फडके ते डॉ. रत्ना फडके यांचेपर्यंत विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिला इतक्या मोठया संख्येने कल्याणात होत्या हे वाचून अभिमान वाटू लागतो.

कल्याण शहाराची प्रसिध्दी महाराष्ट्रातच नाही, तर भारतातही आहे. जशी ती आज आहे तशीच ती कालही होती आणि उदयाही असेल, कल्याण शहराशी असंख्य नागरीक व अनेक प्रसंग निगडीत आहेत. अगदी प्राचीन काळापासून आजही कल्याण डोंबिवली, अंबरनाथ ते थेट कर्जत - कसाऱ्यापर्यंतच्या नागरीकांना काहींना काही कारणाने या शहरात यावे लागते. भाजी - पाला, कापड, धान्य, सोने - नाणे अशा असंख्य कारणांनी या शहारांशी निगडीत आहेत . आज हे शहर चोहोबाजूंनी वाढलेले व फुललेले दिसते. गृहनिर्माण सोसायटयांचे जाळेच या शहरात गुंफले जात आहे. कल्याण म्हणताच आठवते ते छत्रपती महाराज आणि कल्याणच्या सुभेदाराची सुन ! खरंतर यापूर्वीचाही इतिहास कल्याणला आहे. इ.स. पूर्वीच्या दुसऱ्या तिसऱ्या

शतकापासूनचा जगाच्या नकाशावरील भरभराटीला आलेल्या प्रसिध्द बंदरापैकी एक बंदर प्रसिध्द बाजारपेठ म्हणजे कल्याण.

मुंबईच्या वायव्य दिशेला ५३ किलोमीटर अंतरावर ठाणे जिल्हयातील कल्याण शहर १९- १४ अक्षांश व ५३- १२ या रेखाशांवर वसलेले आहे. कल्याण हे आज मध्य रेल्वेचे मोठे जंक्शन आहे. आज जसे ते जंक्शन म्हणून प्रसिध्द आहे,. तसेच प्राचीनकाळी ते राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्र म्हणून प्रसिध्द होते. भारताच्या पश्चिम किनारपटटीवर महत्वाचे बंदर होते. मध्यपूर्व- पश्चिमात्य देशांशी जलमार्गाने जोडलेली ही एक बाजारपेठ होती.

ज्ञानाचे अनेक उददेश असून 'ज्ञान देणे' ही संकल्पना विविध अर्थाने क्षेत्रात वापरली जाते. काळाप्रमाणे ज्ञान कल्पना जशी बदलत गेली तशीच ज्ञान संज्ञा वाढत गेली. तंत्रज्ञान आणि माहिती प्रसारणातील अत्याधुनिक बदलांमुळे अनेक कल्पना कालबाहय झाल्या. अनेक कल्पनात नव्याने भर पडली . तर काही कल्पनात दुरूस्ती करणे अटळ झाले. तरी 'बदल' हा स्थायिभान असल्याने तो अपेक्षित ठरतो जे जे आणि जेथे बदल घडवले जातील तेथे 'वर्तमान' नोंदवून ठेवणे आवश्यक आहे.

ज्ञानाच्या उददेश आनंद देणे असतो. शिक्षण व्यवस्था या संदर्भातील आनंद अवर्णनीय आणि आगळावेगळा होय , कारण इतर सर्व प्रकारांच्या आनंदाचा स्त्रोत 'शिक्षण' होय.

गुरूकूल आश्रमाचा धर्तीवर विदयार्थिनीला घरी शिकवले जात होते. (मात्र गुरूकूल पध्दती पूर्णतः वेगळी होती) आकडेमोड व काही संख्यांची माहिती दिली जात असे. धर्म, धार्मिक सण, उत्साहाबाबतचे ज्ञान दिले जाई. 'मोडी अक्षर' ओळख मोठयाने स्पष्ट वाचन करता येणे म्हणजे शिक्षणं अशी कल्पना होती. मुस्लिंम समाजात

कुराणाचे वाचन करता येणे म्हणजे शिक्षण असे समजले जाई. मुस्लिम मोहल्यातून या पलीकडचे ज्ञान मिळवणे निश्चित होते. धार्मिक शिक्षणसुध्दा मराठीतूनच दिले जाई. धर्मगुरू घरी येऊन फक्त मुलींना 'माहिती' देत. प्रतिप्रश्न विचारणे, चौकशी करणे , शंका प्रदर्शित करणे इ. बाबी नव्हत्या.

व्यापारासाठी आलेल्या युरोपीय व्यापाऱ्यामुळे नव्या शिक्षणाची गरज भासली. पाश्चात्यांच्या वैचारिक देवघेणीमुळे 'शिक्षण क्षेत्र' जागृत होत गेले. शिक्षणाच्या मर्यादा अनुभवून ठोस स्वरूपात जागृती होऊन पहिली शाळा १८३० ला निघाली. संपूर्ण ठाणे जिल्यात ५ शाळा सुरू झाल्या. त्यापैकी १ शाळा मुलींची होती. शाळा म्हणजे एक दिव्य अशीच कल्पना होती. शिक्षण हा विषय आस्थेचा नव्हता. अनेक जण विविध शंकात ग्रासलेले होते. पालक शाळेत पाठवण्यास धजत नव्हते.

**३.२ स्त्री - शिक्षण** - मुलींची स्वतंत्र शाळा असावी. सर्व मुलींना शिकावे असे ध्यास घेतलेले अनेकजण होते. अप्पासाहेब देऊस्कर व बनुताई देशापांडे यांनी पहिला यशस्वी प्रयत्न केला. बनुताईंनी या कारणास्तव 'संसारिक जीवन' न जगण्याचा निर्णय घेतला होता. आवडाबाई मोरे, देशमुख, आपटे यांनी घरोघरी जाऊन मुलींना शाळेत पाठवण्यासाठी समाजाचा रोष पत्करला. वैदयकीय शिक्षणामधील आनंदीबाई जोशी आपल्या पहिल्या भारतीय स्त्री, समाजात स्त्री शिक्षणाचा याहून वेगळा आदर्श निर्माण करण्याचा निर्धार केला पण अल्प आयुष्यामुळे ते 'स्वप्न' ठरले.

१९६० नंतर प्रत्येक दशकात बदल आणि अनुकूलता वाढली. शासकीय भूमिका बदलल्या. शिक्षकांना सेवा शाश्वती, पुरेसे वेतन, अनुदान इ. मुळे 'शिक्षण' हा आस्थेचा विषय झाला. अलिकडे या सेवेचा 'व्यवसाय' झाला आहे. वाढत्या

लोकसंख्येप्रमाणे व्यवस्थासुध्दा वाढत गेली. आजच्या घडीस ४७ पेक्षा जास्त हायस्कूल ६ महाविदयालये , डझनभर उच्च व माध्यमिक शाळा असून विना अनुदानित शिक्षण संस्था शाळाची चांगलीच वाढ झाली आहे.

## ३.३ अभ्यासात घेतलेल्या महाविदयालयांची व त्यांच्या ग्रंथालयांची माहिती :

### १) बिर्ला कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स, बिर्ला कॉलेज रोड, कल्याण (प.) जि. ठाणे . पिनः ४२१ ३०१.

| | | |
|---|---|---|
| E-mail ID | - | birlaprincipal@sify.com |
| Website | - | birla college.org |
| Estd. | - | 1972 |
| NAAC Grade | - | A |
| Reference | - | www.birlacollege.org |

बिर्ला महाविदयालयाची १७ जून १९७२ साली स्थापना झाली. हे महाविदयालय NATA Test Centre – Code MH 17 आहे. मुंबई विदयापीठाशी संलग्न असून विविध शाखेतील उच्च शिक्षणासाठी संपन्न असून ९००० विदयार्थि या महाविदयालयात शिक्षण घेत आहेत. महाविदयालयात प्राध्यापकांची संख्या १५० आहे. महाविदयालयीन परिसर हा २० एकर जागेत वसला असून कल्याण शहरात (मुंबई पासून ५४ कि.मी.) वसले आहे. महाविदयालयात ग्रंथालयाची स्वतंत्र इमारत आहे.त्याचे क्षेत्रफळ एकुण ६००० स्के. फूट आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते संध्याकाळी ५ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते. ग्रंथालयात सर्वांसाठी खुले प्रणाली पध्दती आहे. विदयार्थ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले

जातात. शिक्षकांना १५ ग्रंथ ३० दिवसांकरीता दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना २ ग्रंथ १५ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण करण्याकरीता एक मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे. ग्रंथसंग्रह दालनात ग्रंथ संग्रह करण्याकरीता ४ लोखंडी कपाटे आणि रॅकसची व्यवस्था केली आहे. ग्रंथालयात संदर्भ विभाग आहे त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे रॅकस ठेवले आहेत. स्वतंत्र विभाग नाही. नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी पुढुन सपाट रॅकस आहेत. ग्रंथप्रक्रिया विभाग ग्रंथालयाच्या एका बाजूला असुन त्यामध्ये ग्रंथावर संपूर्ण सोपस्कर होतात.
ग्रंथालयात अमुद्रित साहित्य ठेवण्याकरीता लाकडी बॉकस तयार करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण ४ संगणक आहेत त्यापैंकी एक विदयार्थ्यांकरीता आहे. ग्रंथालयात Soul Sofware, Bar Code System, Opac System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात वाचनकक्षाची मर्यादा सुमारे ८० विदयार्थी वाचन करू शकतील एवढी आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत. ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे.ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एक सीझ फायरची व्यवस्था केली आहे. वरील महाविदयालय यु.जी.सी. च्या सी.पी.ई (Colleges Potentiel For Excellence) या योजनेखाली संबोधली गेली आहे. महाविदयालयास (NAAC) तर्फे A ग्रेड हया श्रेणीचा बहुमान २००२ पासून बहाल करण्यात आला आहे.

या महाविदयालयात कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विविध शिक्षणक्रम राबवले जातात, तसेच पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम उदा. Botany, Biotechnology, Biomalytical Sciences, Environmental Sc., Chemistry , Computer Science.

वरील महाविदयालयात ३ वर्षाचे BMS / BMM कोर्स देखील आयोजित केले जातात.

ग्रंथालय - महाविदयालयांच्या ग्रंथालय १६,००० क्रमिक व संदर्भ ग्रंथ असून विविध नियतकालिके व वर्तमानपत्रे यांनी संपन्न आहे. अमेरिकन लायब्ररी व ब्रिटीश कौन्सिल यांचे सभासदत्व या ग्रंथालयाला आहे, विदयार्थांना प्रतिलिपीची सोय व हवेशीर अशा वाचन कक्षाची सोय उपलब्ध आहे.

**२) के. एम. अग्रवाल कॉलेज ऑफ आर्टस , कामर्स ॲण्ड सायन्स , पडघा रोड , गांधारे , कल्याण (प.) जि. ठाणे . पिन : ४२१ ३०१.**

| | | |
|---|---|---|
| E-mail ID | - | kmagrawalcollege@yahoo.co.in |
| Website | - | www.kmagrawalcollege.com |
| Estd. | - | 1994 |
| NAAC Grade | - | B+ |
| Reference | - | www.agrawalcollege.org |

या महाविदयालयाची स्थापना १९९४ मध्ये झाली असून हिन्दी भाषिक जनकल्याण शिक्षण संस्था, कल्याण यामार्फत चालविले जाते. हे महाविदयालय मुंबई विदयापीठाशी संलग्न असून NAAC ने B+ श्रेणीचे सम्मानीत केले आहे. सध्या ६००० विदयार्थी शिक्षण घेत असून त्यामध्ये B.Sc., B.A., B.Com., M.Sc., BBI M.A ., M.Com Certificate Course in Basic Accainting , BMS वगैरे कोर्सेस चालवले जातात. महाविदयालयात प्राध्यापकांची संख्या २०० आहे. महाविदयालयातील कर्मचाऱ्यांची संख्या ३० आहे. महाविदयालयीन ग्रंथालय महाविदयालयाच्या इमारतीच्या आवारातच आहे. ग्रंथालयाचे एकुण क्षेत्रफळ ३,७२० स्के. फूट आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते संध्याकाळी ६ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते.

ग्रंथालयात सर्वासांठी खुले प्रणाली पध्दती आहे. विदयार्थ्यांना ३ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. शिक्षकांना ५ ग्रंथ १५ दिवसांकरीता दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना ३ ग्रंथ १५ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण करण्याकरीता एक मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे. ग्रंथसंग्रह दालनात ग्रंथ संग्रह करण्याकरीता ४ लोखंडी कपाटे आणि रॅक्सची व्यवस्था केली आहे. ग्रंथालयात संदर्भ विभाग आहे त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भ ग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे रॅक्स ठेवले आहेत . स्वतंत्र विभाग नाही.

नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी पुढुन सपाट रॅक्स आहेत. ग्रंथप्रक्रिया विभाग ग्रंथालयाच्या एका बाजूला असुन त्यामध्ये ग्रंथावर संपूर्ण सोपस्कर होतात. ग्रंथालयात अमुद्रित साहित्य ठेवण्याकरीता लाकडी बॉक्स तयार करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण ४ संगणक आहेत , त्यापैकी एक विदयार्थ्यांकरीता आहे. ग्रंथालयात Soul Sofware , Bar Code System , Opac System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात स्वतंत्र वाचनकक्ष आहे. वाचनकक्षाची मर्यादा सुमारे १५० विदयार्थि वाचन करू शकतील एवढी आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत. ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे. ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एक सीझ फायरची व्यवस्था केली आहे. वरील महाविदयालय यु.जी.सी. च्या सी.पी.ई (Colleges Potentiel For Excellence) या योजनेखाली संबोधली गेली आहे. महाविदयालयास (NAAC) तर्फे B ग्रेड हया श्रेणीचा बहुमान बहाल करण्यात आला आहे.

या महाविदयालयात सुसंपन्न असे ग्रंथालय असून त्यात ३३,९९६/- पुस्तके संदर्भ ग्रंथ आहेत. विविध नियतकालीके, वर्तमानपत्रे यांची सोय आहे.

**३) नॅशनल उर्दू कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स, आग्रा रोड, कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१.**

| | | |
|---|---|---|
| E-mail Id | - | nucollege @gmail.com |
| Website | - | www.nucollege.com |
| Estd | - | 1990 |
| Reference | - | www.nucollege.com |

या महाविदयालयाची इ. स. १९९० मध्ये कल्याण नॅशनल उर्दू कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड विज्ञान अशी झाली . या महाविदयालयात मुस्लिम कम्युनिटी साठी मान्यता प्राप्त करण्यात आली. या महाविदयालयात ज्युनियर कॉलेज पर्यंत शिक्षण उपलब्ध आहे.

या महाविदयालयात N.C.C., N.S.C. यांची सोय असल्याने विदयार्थ्यांचा विकास चांगल्या तऱ्हेने होतो. या महाविदयालयाची विदयार्थि संख्या ५६० आहे. महाविदयालयात प्राध्यापकांची संख्या २५ आहे. महाविदयालयातील कर्मचाऱ्यांची संख्या ६ आहे. महाविदयालयीन ग्रंथालय महाविदयालयाच्या इमारतीच्या आवारातच आहे. ग्रंथालयाचे एकुण क्षेत्रफळ १८०० चौ. मी. आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते संध्याकाळी ६ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते. ग्रंथालयात सर्वासांठी खुले प्रणाली पध्दती आहे. विदयार्थ्यांना ३ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. शिक्षकांना ३ ग्रंथ १५ दिवसांकरीता दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना ३ ग्रंथ १५ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण

करण्याकरीता एक मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे. ग्रंथसंग्रह दालनात ग्रंथ संग्रह करण्याकरीता लोखंडी कपाटे आणि १ लाकडी रॅकसची व्यवस्था केली आहे. ग्रंथालयात संदर्भ विभाग आहे त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भ ग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे रॅक्स ठेवले आहेत . स्वतंत्र विभाग नाही. नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी पुढुन सपाट रॅक्स आहेत. ग्रंथप्रक्रिया विभाग ग्रंथालयाच्या एका बाजूला असुन त्यामध्ये ग्रंथावर संपूर्ण सोपस्कर होतात. ग्रंथालयात अमुद्रित साहित्य ठेवण्याकरीता लाकडी बॉक्स तयार करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण ५ संगणक आहेत ,त्यापैकी एक विदयार्थ्यांकरीता आहे. ग्रंथालयात Soul Sofware, Bar Code System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात स्वतंत्र मुलींसाठी आणि मुलांसाठी वाचनकक्ष आहे. वाचनकक्षाची मर्यादा सुमारे ५० विदयार्थी वाचन करू शकतील एवढी आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत. ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे. ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एक सीझ फायरची व्यवस्था केली आहे.

वरील महाविदयालय यु.जी.सी. च्या सी.पी.ई (Colleges Potentiel For Excellence) या योजनेखाली संबोधली गेली आहे. महाविदयालयाची ग्रंथसंपदा ७०६१ च्या वर आहे. ग्रंथालय संगणकीकृत आहे.

## ४) साकेत कॉलेज ऑफ आर्टस , कॉमर्स आणि सायन्स , साकेत विदयानगरी मार्ग, चिंचपाडा रोड, काटेमानवली , कल्याण (पू). पिन : ४१२ ३०६.

| | | |
|---|---|---|
| E-mail Id | - | t&d@saketgyanpeeth.org |
| Website | - | www.saket.edu |
| Estd | - | 1998 |
| Reference | - | www.saket.edu |

या महाविदयालयाची स्थापना १९९८ साली झाली. सुरूवातीला केवळ २५० विदयार्थी होते. महाविदयालय मुंबई विदयापीठाशी संलग्न असून विविध शाखेतील उच्च शिक्षणासाठी संपन्न आहे. ३०६६ विदयार्थी या महाविदयालयात शिक्षण घेत आहेत. महाविदयालयात प्राध्यापकांची संख्या ५२ आहे. शिक्षक युजीसी दवारा प्रमाणित नेट आणि सेट परिक्षा पारंगत असा प्राध्यापक वर्ग या महाविदयालयात कार्यरत आहे. महाविदयालयाचे ग्रंथालय इमारतीच्या पहिल्या मजल्यावर आहे. त्याचे क्षेत्रफळ एकुण २५० चौ. मी. आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ७.४५ ते संध्याकाळी ५ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते. ग्रंथालयात सर्वासांठी खुले प्रणाली पध्दती आहे. विदयार्थ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. शिक्षकांना १० ग्रंथ १५ दिवसांकरीता दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना १ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण करण्याकरीता दोन मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे. ग्रंथसंग्रह दालनात ग्रंथ संग्रह करण्याकरीता १० लोखंडी रॅक्सची व्यवस्था केली आहे.

ग्रंथालयात संदर्भ विभाग आहे त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे रॅक्स ठेवले आहेत . स्वतंत्र विभाग नाही. नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी पुढुन सपाट रॅक्स आहेत. ग्रंथप्रक्रिया विभाग

ग्रंथालयाच्या एका बाजूला असुन त्यामध्ये ग्रंथावर संपूर्ण सोपस्कर होतात. ग्रंथालयात अमुद्रित साहित्य ठेवण्याकरीता लाकडी बॉक्स तयार करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण ५ संगणक आहेत त्यापैंकी एक विदयार्थ्यांकरीता आहे. तसेच इंटरनेट ची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. ग्रंथालयात Soul Sofware , Bar Code System , Opac System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात वाचनकक्षाची मर्यादा सुमारे २१० विदयार्थी वाचन करू शकतील एवढी आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत. ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे.ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एकसीझ फायरची व्यवस्था केली आहे.

वरील महाविदयालय यु.जी.सी. च्या सी.पी.ई (Colleges Potentiel For Excellence) या योजनेखाली संबोधली गेली आहे. महाविदयालयास (NAAC) तर्फे A ग्रेड हया श्रेणीचा बहुमान २०११ पासून बहाल करण्यात आला आहे.

महाविदयालयात २२ Under Graduate Dept. & Research Centeres , 7 Professional Courses चालवले जातात. या महाविदयालयात B.A., B.Sc., B.Com , M.Com (Business Mgt.,), M.Sc, Labroratory ,Technology, Hospitability Mgt., Clinical Research तसेच Botany, Hindi इतिहास , सूक्ष्म शास्त्र इ. विषयात Ph.D चे अभ्यासक्रम राबवले जातात. यशवंतराव चव्हाण मुक्त विदयापीठाचे MBA., B.A.,B.Com., M.Phill इ. अभ्यासक्रम आयोजित केले जातात.

या महाविदयालयात सुसंपन्न असे ग्रंथालय असून विविध विषयावरील ग्रंथसंपदा मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. येथील ग्रंथालयात ७३,२७७ ग्रंथ उपलब्ध आहेत.

तसेच ४ भाषेतील २० वर्तमानपत्रे , नियतकालिके घेतली जातात. दरवर्षी ग्रंथालय ८०० ते १२०० पुस्तके खरेदी करते. महाविदयालयास (NAAC) तर्फे A ग्रेड हया श्रेणीचा बहुमान २०११ पासून बहाल करण्यात आला आहे.

**५) आयडीयल ज्युनियर कॉलेज आर्टस, कामर्स अॅण्ड सायन्स , हनुमान टेकडी , पुना लिंक रोड, काटेमानवली, कल्याण (पू.) पिन : ४२१ ३०६.**

| | | |
|---|---|---|
| E-mail Id | - | idealcollege@gmail.com |
| Estd | - | 1991 |
| Website | - | www.idealcollege.com |
| Reference | - | www.idealcollege.com |

या महाविदयालयाची स्थापना १९९१ साली झाली. महाविदयालयात १७०० विदयार्थि शिक्षण घेत आहेत. या महाविदयालयात B.A., B.Com., B.M.S. वगैरे शिक्षणक्रम शिकवले जातात. या महाविदयालयाच्या ग्रंथालयात ५,००० क्रमिक पुस्तके तसेच संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहे. महाविदयालयाची विदयार्थि संख्या १७०० आहे. महाविदयालयात प्राध्यापकांची संख्या २५ आहे. महाविदयालयातील कर्मचाऱ्यांची संख्या ६ आहे. महाविदयालयीन ग्रंथालय महाविदयालयाच्या इमारतीच्या आवारातच आहे. ग्रंथालयाचे एकुण क्षेत्रफळ ११०० चौ. मी. आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ५ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते. ग्रंथालयात सर्वासांठी खुले प्रणाली पध्दती आहे. विदयार्थ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. शिक्षकांना ५ ग्रंथ १७ दिवसांकरीता दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण करण्याकरीता एक मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे. ग्रंथसंग्रह दालनात

ग्रंथ संग्रह करण्याकरीता ४ लोखंडी कपाटे आणि लाकडी रॅक्सची व्यवस्था केली आहे. ग्रंथालयात संदर्भ विभाग आहे, त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भ ग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे रॅक्स ठेवले आहेत . स्वतंत्र विभाग नाही.

नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी पुढुन सपाट रॅक्स आहेत. ग्रंथप्रक्रिया विभाग ग्रंथालयाच्या एका बाजूला असुन त्यामध्ये ग्रंथावर संपूर्ण सोपस्कर होतात. ग्रंथालयात अमुद्रित साहित्य ठेवण्याकरीता लाकडी बॉक्स तयार करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण २४ संगणक आहेत , त्यापैंकी २० विदयार्थ्यांकरीता आहे. ग्रंथालयात Soul Sofware , Bar Code System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात स्वतंत्र मुलींसाठी आणि मुलांसाठी वाचनकक्ष आहे. वाचनकक्षाची मर्यादा सुमारे १५० विदयार्थी वाचन करू शकतील एवढी आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत. ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे. ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एक सीझ फायरची व्यवस्था केली आहे. ग्रंथालय संगणकीकृत आहे.

**६) जीवनदीप एज्युकेशन संस्था आर्टस , कॉमर्स अॅण्ड सायन्स , कल्याण (पू.)**

**पिन :४२१ ३०६.**

E-mail Id - jeevnadeepedu@gmail.com

Estd - 2005

Website - www.jeevandeepedu.com

Reference - www.jeevandeepedu.com

जीवनदीप एज्युकेशन संस्थेची स्थापना १९९५ साली झाली. त्यावेळेस गुणवत्तादायक उच्च शिक्षण या हेतुने कल्याण शहरातील विदयार्थ्यांची सोय व्हावी हा प्रमुख उददेश होता

वरील महाविदयालयात कला , वाणिज्य आणि विज्ञान शाखा अंतर्भूत असून त्यााचबरोबर बी. कॉम ( बॅकींग ॲण्ड इन्श्युरन्स) हा देखील अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आलेला आहे. २००९ पासून Post Graduate Programme देखील राबवला जातो.

या महाविदयालयाच्या ग्रंथालयात १२,४१० क्रमिक पुस्तके तसेच संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहे. महाविदयालयाचे ग्रंथालय विविध विषयावरच्या ८००० पुस्तकांनी संपन्न असून ५० प्रमुख नियतकालिके, वर्तमानपत्रे घेतली जातात. महाविदयालयाची विदयार्थी संख्या २५७९ आहे. महाविदयालयात प्राध्यापकांची संख्या ४० आहे. महाविदयालयातील कर्मचाऱ्यांची संख्या ६ आहे. महाविदयालयीन ग्रंथालय महाविदयालयाच्या इमारतीच्या आवारातच आहे. ग्रंथालयाचे एकुण क्षेत्रफळ २,००० चौ. मी. आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते संध्याकाळी ५ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते. ग्रंथालयात सर्वासांठी खुले प्रणाली पध्दती आहे. विदयार्थ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. शिक्षकांना ५ ग्रंथ १५ दिवसांकरीता दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण करण्याकरीता एक मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे. ग्रंथसंग्रह दालनात ग्रंथ संग्रह करण्याकरीता २ लोखंडी कपाटे आणि लाकडी रॅकसची व्यवस्था केली आहे. ग्रंथालयात संदर्भ विभाग आहे, त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे रॅक्स ठेवले आहेत . स्वतंत्र विभाग नाही.

नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी पुढुन सपाट रॅक्स आहेत. ग्रंथप्रक्रिया विभाग ग्रंथालयाच्या एका बाजूला असुन त्यामध्ये ग्रंथावर संपूर्ण सोपस्कर होतात. ग्रंथालयात अमुद्रित साहित्य ठेवण्याकरीता लाकडी बॉक्स तयार करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण ५ संगणक आहेत , त्यापैंकी १ विदयार्थ्यांकरीता आहे. ग्रंथालयात Soul Sofware , Bar Code System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात विदयार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष आहे. वाचनकक्षाची मर्यादा सुमारे ५० विदयार्थी वाचन करू शकतील एवढी आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत. ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे. ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एक सीझ फायरची व्यवस्था केली आहे. ग्रंथालय संगणकीकृत आहे.

जीवनदीप महाविदयालय मुंबई विदयापीठाशी संलग्न असून त्याचबरोबर विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रम उदा. B.M.S. (Bachelor of Mgt.,Studies) B.B.I. (Banking & Insurance) M.A., M.Com.

**७) मोहिंदरसिंग काबलसिंग ज्युनियर कॉलेज ऑफ आर्टस , कॉमर्स ॲण्ड सायन्स, गणपती चौक, आग्रा रोड, कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१.**

E-mail Id - mkdc56@yahoo.co.in

Estd - 2003

Website - www.mkcollege.com

Reference - www.mkcollege.com

मोहिंदरसिंग काबलसिंग ज्युनियर कॉलेज ऑफ कला , वाणिज्य आणि विज्ञान शाखातील विविध अभ्यासक्रमाचे उपक्रम राबवले जातात. महाविदयालय हे मुंबई विदयापीठाशी संलग्नित आहे. महाविदयालयाची स्थापना २००३ साली कल्याण शहरात झाली. त्यावेळेस गुणवत्तादायक उच्च शिक्षण या हेतूने विदयार्थ्यांची सोय व्हावी हा प्रमुख उददेश होता.

या महाविदयालयाच्या ग्रंथालयात ४,६५० क्रमिक पुस्तके तसेच संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहे. महाविदयालयाचे ग्रंथालय विविध विषयावरच्या पुस्तकांनी संपन्न असून ५० प्रमुख नियतकालिके, वर्तमानपत्रे घेतली जातात. महाविदयालयाची विदयार्थि संख्या ७५० आहे. महाविदयालयात प्राध्यापकांची संख्या २५ आहे. महाविदयालयातील कर्मचाऱ्यांची संख्या ६ आहे. महाविदयालयीन ग्रंथालय महाविदयालयाच्या इमारतीच्या तळमजल्यावर आहे. ग्रंथालयाचे एकुण क्षेत्रफळ ३,३५० चौ. मी. आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ३ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते. ग्रंथालयात सर्वासांठी खुले प्रणाली पध्दती आहे. विदयार्थ्यांना १ ग्रंथ ३ दिवसांकरीता दिले जातात. शिक्षकांना बेमुदत ग्रंथ दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण करण्याकरीता आतील बाजुस एक मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे. ग्रंथसंग्रह दालनात ग्रंथ संग्रह करण्याकरीता १५ लोखंडी कपाटे आणि २ लाकडी रॅकसची व्यवस्था केली आहे. ग्रंथालयात संदर्भ विभागास स्वतंत्र विभाग नाही. त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे लाकडी सपाट रॅक्स ठेवले आहेत . स्वतंत्र विभाग नाही.

नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी लाकडी कपाटे आहेत. ग्रंथप्रक्रिया करण्यासाठी वेगळे दालन नाही. ग्रंथालयात अमुद्रित साहित्य

ठेवण्याकरीता लाकडी बॉक्स तयार करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण २ संगणक आहेत, त्यापैकी १ विदयार्थ्यांकरीता आहे. ग्रंथालयात Soul Sofware , Bar Code System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात विदयार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष आहे. वाचनकक्षाची मर्यादा सुमारे ५० विदयार्थी वाचन करू शकतील एवढी आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत. ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे. ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एक सीझ फायरची व्यवस्था केली आहे. ग्रंथालय संगणकीकृत आहे.

वरील महाविदयालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखा अंतर्भूत असून त्याच बरोबर बी.कॉम ( बँकींग अॅण्ड इन्श्युरन्स) हा देखील अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आलेला आहे.

हे कॉलेज मुंबई विदयापीठाशी संलग्न असून त्याचबरोबर विनाअनुदानित अभ्यासक्रम उदा : B.M.S., BBI

महाविदयालयाने नुक्तेच प्रेरणा ,उडडान प्रकाशने संकलीत केली आहेत. वरील कॉलेज कल्याण पश्चिम भागात वसलेले आहे. वाचन कक्ष ही मुख्य ग्रंथालयास जोडलेली आहे. त्यामध्ये विदयार्थी वाचन , अभ्यास करू शकतात. तसेच इंटरनेट ची सोय उपलब्ध करून दिलेली आहे. अमेरिकन लायब्ररी यांचे सभासदत्व या ग्रंथालयाला आहे.

## ८) लक्ष्मण देवराम सोनावणे कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स, कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१.

| | | |
|---|---|---|
| E-mail Id | - | ldsonawane2002@gmail.com |
| Estd | - | 2002 |
| Website | - | www.ldsonawane .com |
| Reference | - | www.ldsonawane .com |
| NAAC | - | B |

लक्ष्मण देवराम सोनावणे कॉलेजची स्थापना २००२ साली कल्याण शहरात झाली. हे कॉलेज मुंबई विदयापीठाशी संलग्न असून विविध शाखेतील उच्च शिक्षणासाठी संपन्न आहे. महाविदयालयामध्ये ४००० विदयार्थि शिक्षण घेत आहेत. प्राध्यापकांची संख्या ७० आहे. महाविदयालयीन परिसर हा ४.२६ एकर जागेत वसला असून कल्याण शहरात स्टेशनपासून ५ कि.मी. अंतरावर वसले आहे. वरील महाविदयालय यु.जी.सी. च्या सी.पी.ई या योजनेखाली संबोधली गेली आहे. महाविदयालयास (NAAC) तर्फे B Grade हया श्रेणीचा बहुमान २०१५ पासून बहाल करण्यात आला आहे.

महाविदयालय कायम विनाअनुदानित तत्वावर आहे. या महाविदयालयात कला, शास्त्र आणि वाणिज्य शाखेतील विविध शिक्षणक्रम शिकवले जातात. तसेच Post Graduate Programme उदाः Botany , Chemistery ,Physics , Mathmatics, Zoology & Microbiology इ. अभ्यासक्रम शिकवले जातात. वरील महाविदयालयात ३ वर्षाचे BMS/ BBI कोर्स देखील आयोजित केले जातात.

महाविदयालयीन ग्रंथालय तिसऱ्या मजल्यावर १०५० स्के.फूट चौ.मी. अश्या जागेवर स्थित आहे. विदयार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्षाची सोय आहे. ग्रंथालय

महाविदयालयांच्या ग्रंथालयात १७,१८२ क्रमिक व संदर्भ ग्रंथ असून विविध नियतकालिके व वर्तमानपत्रे यांनी संपन्न आहे. १८०० जर्नल्स,८०,००० ई बुक्स उपलब्ध आहेत. बुक बँकेची मागासवर्गीय विदयार्थ्यांसाठी सोय आहे. अमेरिकन लायब्ररी यांचे सभासदत्व या ग्रंथालयाला आहे. विदयार्थ्यांसाठी प्रतिलिपीची सोय आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी ८ ते संध्याकाळी ५ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते. ग्रंथालयात सर्वासांठी खुले प्रणाली पध्दती आहे. विदयार्थ्यांना १ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. शिक्षकांना बेमुदत ग्रंथ दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण करण्याकरीता आतील बाजुस एक मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे. ग्रंथसंग्रह दालनात ग्रंथ संग्रह करण्याकरीता १५ लोखंडी कपाटे आणि १ लाकडी रॅकसची व्यवस्था केली आहे. ग्रंथालयात संदर्भ विभागास स्वतंत्र विभाग नाही. त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे लाकडी सपाट रॅक्स ठेवले आहेत . स्वतंत्र विभाग नाही.

नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी लाकडी कपाटे आहेत. ग्रंथप्रक्रिया करण्यासाठी वेगळे दालन नाही. ग्रंथालयात अमुद्रित साहित्य ठेवण्याकरीता लाकडी बॉक्स तयार करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण ३ संगणक आहेत , त्यापैकी १ विदयार्थ्यांकरीता आहे. ग्रंथालयात Soul Sofware , Bar Code System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात विदयार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष आहे. वाचनकक्षाची मर्यादा सुमारे ५० विदयार्थी वाचन करू शकतील एवढी आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत.

ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे. ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एक सीझ फायरची व्यवस्था केली आहे. ग्रंथालय संगणकीकृत आहे.

## ९) सेठ हिराचंद मुथा कॉलेज ऑफ आर्टस , कॉमर्स ॲण्ड सायन्स , कल्याण (प.) पिन : ४२१३०१.

| | |
|---|---|
| E-mail Id | - sppeduded@yahoo.co.in |
| Estd | - 2005 |
| Website | - www.shmuthacollege.org |
| Reference | - www.shmuthacollege.org |

या महाविदयालयाची स्थापना २००५ साली कल्याण शहरात झाली. येथे ५६० विदयार्थि शिक्षण घेत आहेत. प्राध्यापकांची संख्या २० आहे. या महाविदयालयात B.A., B.Com., B.M.S. B.Sc वगैरे शिक्षणक्रम शिकवले जातात. या महाविदयालयाच्या ग्रंथालयात ५,६५० क्रमिक पुस्तके तसेच संदर्भग्रंथ उपलब्ध आहे. कायम विनाअनुदानित तत्वावर चालणारे महाविदयालय आहे. महाविदयालय मुंबई विदयापीठाशी संलग्नित आहे. ग्रंथालयात इंटरनेटची सोय आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ५ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते.ग्रंथालयात सर्वासांठी खुले प्रणाली पध्दती आहे.विदयार्थ्यांना १ ग्रंथ ३ दिवसांकरीता दिले जातात. शिक्षकांना बेमुदत ग्रंथ दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण करण्याकरीता आतील बाजुस एक मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे.

ग्रंथसंग्रह दालनात ग्रंथ संग्रह करण्याकरीता १५ लोखंडी कपाटे आणि २ लाकडी रॅकसची व्यवस्था केली आहे. ग्रंथालयात संदर्भ विभागास स्वतंत्र विभाग नाही. त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे लाकडी सपाट रॅक्स ठेवले आहेत . स्वतंत्र विभाग नाही. नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी लाकडी कपाटे आहेत.

ग्रंथप्रक्रिया करण्यासाठी वेगळे दालन नाही. ग्रंथालयात अमुद्रित साहित्य ठेवण्याकरीता लाकडी बॉक्स तयार करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण २ संगणक आहेत, त्यापैंकी १ विदयार्थ्यांकरीता आहे. ग्रंथालयात Soul Sofware , Bar Code System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात विदयार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष आहे. वाचनकक्षाची मर्यादा सुमारे ५० विदयार्थि वाचन करू शकतील एवढी आहे. ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत. ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे. ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एक सीझ फायरची व्यवस्था केली आहे. ग्रंथालय संगणकीकृत आहे.

## १०) बाबा बोडसे कॉलेज आर्टस , कॉमर्स ॲण्ड सायन्स ,पत्रीपूल ,कल्याण (पू.)

**पिनः ४२१ ३०६.**

| | | |
|---|---|---|
| E-mail Id | - | bbodseedu@gmail.com |
| Estd | - | 2005 |
| Website | - | www.bababodsecollege.com |
| Reference | - | www.bababodsecollege.com |

या महाविदयालयाची स्थापना २००५ मध्ये झाली. हे महाविदयालय मुंबई विदयापीठाशी संलग्नित आहे. सध्या या महाविदयालयात ४६५ विदयार्थि शिक्षण घेत आहेत. प्राध्यापकांची संख्या १८ आहे. महाविदयालयात कला, वाणिज्य आणि विज्ञान हया शाखांचे अभ्यासक्रम शिकवले जातात. ग्रंथालयात ५,६५० क्रमिक पुस्तके तसेच संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहे. विविध नियतकालिके व वर्तमानपत्रे याची सोय आहे. ग्रंथालयाची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ५ अशी आहे. ग्रंथालय सोमवार ते शनिवार चालू असते. ग्रंथालयात सर्वासांठी खुले प्रणाली पध्दती आहे. विदयार्थ्यांना १ ग्रंथ ३ दिवसांकरीता दिले जातात. शिक्षकांना बेमुदत ग्रंथ दिले जातात. इतर कर्मचाऱ्यांना २ ग्रंथ ७ दिवसांकरीता दिले जातात. ग्रंथालयात देवघेव विभागात ग्रंथ देवाणघेवाण करण्याकरीता आतील बाजुस एक मोठे काउंटर ग्रंथालयाच्या सुरूवातीला आहे. ग्रंथसंग्रह दालनात ग्रंथ संग्रह करण्याकरीता १५ लोखंडी कपाटे आणि २ लाकडी रॅक्सची व्यवस्था केली आहे. ग्रंथालयात संदर्भ विभागास स्वतंत्र विभाग नाही. त्यात ग्रंथालयातील साहित्य शक्यतोवर संदर्भग्रंथ असुन त्या करीता वेगळे असे लाकडी सपाट रॅक्स ठेवले आहेत . स्वतंत्र विभाग नाही. नियतकालिक विभागात नियतकालिके ठेवण्यासाठी लाकडी कपाटे आहेत. ग्रंथप्रक्रिया करण्यासाठी वेगळे दालन नाही. ग्रंथालयात अमुद्रित साहित्य ठेवण्याकरीता लाकडी बॉक्स तयार

करण्यात आले आहेत व ते लोखंडी कपाटामध्ये ठेवण्यात येतात. स्वतंत्र विभाग नाही. ग्रंथालयात एकूण २ संगणक आहेत , त्यापैकी १ विदयार्थ्यांकरीता आहे. ग्रंथालयात Soul Sofware , Bar Code System वापरण्यात आलेले आहे. ग्रंथालयात विदयार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष आहे. वाचनकक्षाची मर्यादा सुमारे ५० विदयार्थि वाचन करू शकतील एवढी आहे.

ग्रंथालयात प्राध्यापकांकरीता वाचनकक्षाची मर्यादा किमान १० प्राध्यापक बसु शकतील एवढी आहे. विदयार्थ्यांना बॅग्स ठेवण्याकरीता लाकडी दोन कपाटे आहेत. ग्रंथालयामध्ये नवीन ग्रंथ आले त्याविषयी माहिती देण्याकरीता लाकडी रॅक तयार केली आहे. ग्रंथालयामध्ये आपातकालीन घडामोडी झाली तर एक सीझ फायरची व्यवस्था केली आहे. ग्रंथालय संगणकीकृत आहे.

पुढील प्रकरणांत महाविदयालयीन ग्रंथालयाच्या वाचकवर्गाच्या समस्याबाबत विचारलेल्या प्रश्नावलीचे माहितीचे संकलन , विश्लेषण आणि सादरीकरण केलेले आहे.

# प्रकरण चौथे

# माहितीचे संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण

## ४.१ नमुना निवड

सामाजिक संशोधनामध्ये समस्येचे उत्तर शोधून संशोधन प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी जी माहिती गोळा करावी लागते ती व्यक्ती व संस्थाकडून मिळवावी लागते. या संशोधन विषयाशी संबधित व्यक्तींच्या किंवा संस्थांच्या समूहात जनसंख्या असे म्हणतात.

प्रस्तुत संशोधनामध्ये प्रत्यक्ष निरीक्षण हे प्रश्नावलीच्या साहाय्याने केले आहे. कल्याण परिसरातील १० प्रमुख महाविदयालयातील विदयार्थिनी वाचकवर्ग ग्रंथपाल व ग्रंथालय सल्लागार समितीतील प्राध्यापकांना भेटून त्यांना प्रश्नावली सादर केलेली आहे. विविध स्तरांतून विदयार्थिनींना त्यांना येणाऱ्या ग्रंथालयीन समस्येबददल प्रश्नावलीच्या साहाय्याने प्रत्यक्ष विचारणा करून हे निरीक्षण साध्य केलेले आहे. त्यामुळे वास्तवदर्शन व समस्येबददल चर्चा केल्यामुळे हे निरिक्षण जास्त विदयार्थिनीभिमुख करण्याचा या संशोधनात प्रयत्न केला आहे. त्यामुळे नमुनेची निवड ही उपलब्ध असलेल्या विविध विषयाच्या विदयार्थिनी वाचकवर्ग व त्याच्यांशी प्रश्नावलीच्या सहाय्याने निरिक्षण हा प्रमुख मुददा नमुन्याची निवड म्हणुन झालेला आहे.

संशोधनाला जी जनसंख्या विचारात घेतली जाते ती एक व्यक्ती, संस्था, गांव, राज्य असे संशोधनाच्या आवश्यकतेनुसार काहीही असू शकते. "जनसंख्येतील प्रतिनिधिक निवड केलेल्या लहान संचाला किंवा त्या गटाला त्या जनसंख्येचा न्यादर्श नमुना असे म्हणतात."

जनसंख्या निश्चित झाली की, त्यातून न्यादर्श निवडणे सोपे होते. जनसंख्येतील सर्व घटकांकडून माहिती संकलीत करणे शक्य नसते. त्यामुळे न्यादर्शावर संशोधन केल्यामुळे वेळ, श्रम व पैसा यांची बचत होते व संशोधन जलद गतीने संपवणे शक्य होते.

प्रस्तुत संशोधनामध्ये नमुना निवडीसाठी न्यादर्शच्या 'असंभाव्यता पध्दती' चा अवलंब करण्यात आलेला आहे. अभ्यासकाच्या निर्णयानुसार न्यादर्शातील घटकांची निवड करणे हे या पध्दतीचे वैशिष्टय आहे. अभ्यासकाच्या योग्य निर्णयाच्या आधारांवर केलेली निवड अधिक प्रातिनिधिक सोयीस्कर असते. या विचारसरणीवर असंभ्याव्यता न्यादर्श पध्दती आधारलेली आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये न्यादर्श पध्दतीपैकी "प्रासंगिक न्यादर्श पध्दती" चा समावेश केलेला आहे.

प्रस्तुत संशोधनात कल्याण शहरातील निवडक महाविदयालयातील विदयार्थिनी वाचकवर्गाची निवड ही प्रासंगिक न्यादर्श पध्दतीने केलेली आहे.

## ४.२ न्यादर्शाचा आकार

प्रस्तुत संशोधनामध्ये न्यादर्शाचा आकार एकूण जनसंख्येच्या प्रमाणापत खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

विदयार्थिनी वाचकवर्ग : ३३.८०%

प्रस्तुत संशोधनात कल्याण शहरातील महाविदयालयातील विदयार्थिनी वाचक वर्गातील विदयार्थिनींना प्रश्नावली देण्यात आल्या पण ३३.८०% विदयार्थिनी वाचक्वर्गांनी भरून दिल्या.

## ४.३ अभ्यासासाठी निवडलेल्या महाविदयालयीन ग्रंथालयाची यादी व विदयार्थिनी संख्या

| अनु. क्र. | महाविदयालयाचे नांव | विदयार्थिनी संख्या |
|---|---|---|
| १. | बिर्ला कॉलेज ऑफ आर्टस्,कामर्स ॲण्ड सायन्स बिर्ला कॉलेज रोड, कल्याण (प.) जि. ठाणे पिन : ४२१ ३०१. | ६७५० |
| २. | के. एम. अग्रवाल कॉलेज ऑफ आर्टस्, कामर्स ॲण्ड सायन्स,पडघा रोड,गांधारे, कल्याण (प.) जि. ठाणे पिन : ४२१ ३०१. | ३९०० |
| ३. | नॅशनल उर्दु कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स, आग्रा रोड,कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१. | ४२० |
| ४. | साकेत कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स साकेत विदयानगरी मार्ग, चिंचपाडा रोड, काटेमानिवली कल्याण (पू.) पिनः ४२१ ३०६. | १९९३ |
| ५. | आयडिअल कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, हनुमान टेकडी, पुना लिंक रोड, काटेमानिवली, कल्याण (पू.) ४२१ ३०६. | १६७७ |
| ६. | जीवनदीप एज्युकेशन संस्था आर्टस् , कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज ,कल्याण (पू.) पिनः ४२१ ३०६. | १२७५ |

| | | |
|---|---|---|
| ७. | मोहिंदरसिंग काबलसिंग ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१. | ५६३ |
| ८. | लक्ष्मण देवराम सोनावणे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१. | २६०० |
| ९. | सेठ हिराचंद मुथा कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स आधारवाडी जेलरोड, उंबरर्डेगाव, कोलवली कल्याण (प.) पिन : ४२१ ३०१. | ३६४ |
| १०. | बाबा बोडसे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स,पत्रीपुल, कल्याण (पू.) पिन : ४२१ ३०६. | ३४९ |

**Source : www.mu.ac.in**

## ४.४ माहितीचे संकलनाचे नियोजन

प्रस्तुत संशोधन प्रकल्पामध्ये माहिती संकलनासाठी प्रश्नावली या साधनांचा व पाहणी तंत्राचा अवलंब केला आहे. प्रश्नावलींचे विश्लेषण करून त्यानंतर तक्ते आणि आलेख या माध्यमाद्वारे सादरीकरण केले आहे. प्रस्तुत संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी विदयार्थिनी वर्गासाठी प्रश्नावली तयार केलेल्या आहेत.

